श्री साईबाबा संस्थान, शिरडीचे अधिकृत नियतकालिक
जानेवारी - फेब्रुवारी २००२ रु. ८/-

# साईलीला

क : द. म. सुकथनकर
कार्यकारी संपादक : विद्याधर ता



# ॥ संकष्टनाशनं श्रीमहागणपतिस्तोत्रम् ॥

श्रीगणेशाय नमः ॥ श्रीनारद उवाच -

प्रणम्य शिरसा देवं गौरीपुत्रं विनायकम् ।
भक्तावासं स्मरेन्नित्यमायुःकामार्थसिद्धये ॥१॥
प्रथमं वक्रतुंडं च एकदंतं द्वितीयकम् ।
तृतीयं कृष्णपिंगाक्षं गजवक्त्रं चतुर्थकम् ॥२॥
लम्बोदरं पंचमं च षष्ठं विकटमेव च ।
सप्तमं विघ्नराजेन्द्रं धूम्रवर्णं तथाष्टमम् ॥३॥
नवमं भालचन्द्रं च दशमं तु विनायकम् ।
एकादशं गणपतिं द्वादशन्तु गजाननम् ॥४॥
द्वादशैतानि नामानि त्रिसंध्यं यः पठेन्नरः ।
न च विघ्नभयं तस्य सर्वसिद्धिकर प्रभो ॥५॥
विद्यार्थी लभते विद्यां धनार्थी लभते धनम् ।
पुत्रार्थी लभते पुत्रान् मोक्षार्थी लभते गतिम् ॥६॥
जपेद्गणपतिस्तोत्रं षड्भिर्मासैः फलं लभेत् ।
संवत्सरेण सिद्धिं च लभते नात्र संशयः ॥७॥
अष्टाभ्यो ब्राह्मणेभ्यश्च लिखित्वा यः समर्पयेत् ।
तस्य विद्या भवेत्सर्वा श्रीगणेशस्य प्रसादतः ॥८॥

। इति श्रीनारदविरचितं श्रीसंकष्टनाशनं गणपतिस्तोत्रं संपूर्णम् ।

श्री साईबाबा संस्थान, शिरडीचे
अधिकृत नियतकालिक

# साईलीला

वर्ष २ अंक २

**जानेवारी-फेब्रुवारी**
**२००२**

इंटरनेट आवृत्ती
URL:http://www.shrisaibabasansthan.org

संपादक
**द. म. सुकथनकर**

कार्यकारी संपादक
**विद्याधर ताठे**

* कार्यालय *

'साईनिकेतन',
८०४-बी, डॉ. आंबेडकर मार्ग,
दादर, मुंबई - ४०० ०१४.
दूरध्वनी :.४१६६५५६, ४१६१२९३
फॅक्स : (०२२) ४१५ ०७९८
ई-मेल : saidadar@bom3.vsnl.net.in

संगणकीय अक्षरजुळणी
**संगणकीय विभाग, मुंबई**
**श्री साईबाबा संस्थान, शिरडी**

मुद्रण
**चिराग प्रिंटर्स, मुंबई**

वार्षिक वर्गणी : रु. ५०/-
आजीव सभासद वर्गणी : रु. १०००/-
परदेशाकरिता वार्षिक वर्गणी
रु. १०००/- (टपालखर्चासहित)
अंकाची किंमत : रु. ८/-

मुद्रक, प्रकाशक द. म. सुकथनकर, अध्यक्ष, श्री साईबाबा संस्थान, शिरडी यांनी हे नियतकालिक, 'साईनिकेतन', ८०४-बी, डॉ. आंबेडकर मार्ग, दादर, मुंबई - १४ येथे छापून प्रसिद्ध केले.

या नियतकालिकातील लेखांत प्रसिद्ध झालेली मते ही त्या लेखांतील लेखकांची स्वतंत्र मते असून त्या मतांशी संपादक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही.



**ओमित्येकाक्षरं ब्रह्म व्याहरन्मामनुस्मरन् ।**
**यः प्रयाति त्यजन्देहं स याति परमां गतिम् ॥**
(भगवद्गीता ८:१३)

## अंतरंग


- **संपादकीय** : विद्याधर ताठे ३
- **॥ सार्थ श्रीगणेश सूक्त व कवच ॥** : डॉ. सी. ग. देसाई ५
- **संतसाहित्यातील 'गणेशवंदना'** : विद्याधर ताठे ८
- **नववर्षाची नवी निळाई** : ॲड. अरुण गोडबोले ११
- **साई वंदना** १२
- **साई उवाच** : संग्राहक - प्र. का. सोमण १५
- **साईसिंधूतील बिंदू** : साईसेविका १८
- **शिरडीतील रंगपंचमीने आम्ही दंग झालो !** : साईली २२
- **पोप जॉन पॉल यांचा संदेश** : फा. फ्रान्सिस दिब्रिटो २५
- **ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज** : प्र. न. जोशी २८
- **स्वामी स्वरूपानंदांचे अमृत बोल** : भालचंद्र गन्द्रे ३०
- **"जाको राखे साइयाँ ।"** : डॉ. सौ. सुनन्दा खेरडे ३४
- **मानवधर्माच्या प्रसाराची गरज** : प्रतापराव निंबाळकर ३७
- **महात्मा बसवेश्वर** : सुनिल रुकारी ३८
- **ग्रंथ परिचय** ४०
- **प्रसन्नता** : पं. श्रीराम आचार्य ४१
- **देवघर** : डॉ. बाळाजी आठवले ४२
- **..."मी देवासाठी"** : डॉ. उर्मिला तेली ४३
- **अभिप्राय** ४५
- **आवाहन** ४८



# श्री साईबाबा संस्थान, शिरडी


## विश्वस्त मंडळ

**श्री. द. म. सुकथनकर**
(अध्यक्ष)

| | | | |
|---|---|---|---|
| श्री. मोहन मो. जयकर | (सदस्य) | श्री. शांताराम रं. मिराणे | (सदस्य) |
| श्री. रमेश दा. सोनी | ,, | श्री. प्रदीप र. पटेल | ,, |
| श्री. प्रकाश प्र. वैशंपायन | ,, | श्री. प्रकाश द. वागस्कर | ,, |
| श्री. भास्कर शं. बोरावके | ,, | श्री. दास ह. इनामदार | ,, |
| श्री. राजीव पुं. रोहोम | ,, | डॉ. अरुण दि. रासने | ,, |
| श्री. शामसुंदर ल. शहाणे | ,, | श्री. रमेश म. केंगे | ,, |
| श्री. चांगदेव ना. डुबे पाटील | ,, | डॉ. विलास द. पोतनीस | ,, |
| डॉ. अजेय चं. गर्जे | ,, | डॉ. तुकाराम चं. राठोड | ,, |
| श्री. कैलास गो. कोते पाटील | ,, | सौ. सुनीता वि. क्षीरसागर | ,, |
| श्री. देवराम बं. पवार | ,, | श्री. मधुकर सोपानराव दंडवते | ,, |

**श्री. भाऊसाहेब रा. वाक्चौरे** (कार्यकारी अधिकारी)

## संपादकीय





**सज्जना एव साधुनां प्रथयन्ति गुणोत्करम् ।**
**पुष्पाणां सौरभं प्रायस्तन्वते दिक्षु मारूताः ॥**
(वारा जसा फुलांचा सुगंध सर्वत्र पसरवितो तद्वतच आपण
सद्गुणांचा सर्वत्र प्रसार करावा. सज्जन व साधुपुरुष तसे करतात.)

**श्री** साईबाबांच्या अशा अनेक लीला आहेत की, ज्यातून आपणास त्यांच्या विश्वव्यापक उदात्ततेचे दिव्य दर्शन घडते. आपण साईबाबांसारख्या विश्वदेवतेचे पूजन करतो, पण आपली दृष्टी व व्यवहार मात्र संकुचित असतो. नव्या वर्षाचा 'श्रीगणेशा' आपण करीत आहोत. अनेक नव्या गोष्टींचे संकल्पही आपण करतो. आपला व्यवहार आपल्या ईष्टदेवतेच्या - साईबाबांच्या शिकवणीच्या विरूद्ध होणार नाही, असा संकल्प आपण यावर्षी करूया. खूप मोठ्या गोष्टींची स्वप्ने व संकल्प करण्यापेक्षा आपण छोट्या-छोट्या गोष्टी ठोसपणे आचरणात आणण्याचा संकल्प करूया. दिखाऊ, प्रदर्शनीय, उपभोगाधिष्ठित सुखापेक्षा आपण आंतरिक सुख-शांतीचा शोध घेऊ या. सारे जग अशांत झालेले आहे, त्यावर हाच एक रामबाण उपाय आहे. बाबांची आपणावर कृपा आहे, तेच आपले मनोरथ पूर्ण करतील.

नव्याचे स्वागत करण्यास माणूस नेहमीच उत्सुक असतो. नाविन्याचे वेड हे माणसाच्या स्वभावातच नैसर्गिकपणे दडलेले असते. नवे गीत व नवे तराणे गाण्यासाठी तो सदैव तत्पर असतो. अतिपरिचयाने रोजचे जिणे त्याला नको असते, काहीतरी बदल हवा असतो. "जुने ते सोने" म्हणत तो इतिहास व पुराणांविषयी आग्रही असतो, पण कालसापेक्ष नव्याचा स्वीकार आवडीपेक्षाही आवश्यकता म्हणून त्याला करणे क्रमप्राप्त असते. आजचे युग हे विज्ञानयुग आहे. स्वातंत्र्यवीर सावरकर म्हणाले तसे या नव्या युगात 'श्रुतीस्मृतीपुराणोक्त' धोरण चालणार नाही तर Up-to-date हाच नव्या युगाचा नवा मंत्र आहे. माझे तेच चांगले हा दुराग्रह सोडून आता सर्व ठिकाणच्या सर्व गोष्टींतील चांगल्याचा

खुलेपणाने आपण स्वीकार केला पाहिजे. अगदी धर्मविचारांबाबतही ! **"माझा धर्म तोच श्रेष्ठ धर्म"** ही भावना कौतुकास्पद खरी. तुम्ही तुमचा धर्म-पंथ जरूर श्रेष्ठ माना, पण इतरांना कमी लेखू नका. दुसऱ्या धर्मतत्त्वाची हेटाळणी - द्वेष करू नका. सर्वशक्तिमान ईश्वराकडे - अल्लाकडे - GODकडे जाण्याचे मार्ग अनेक आहेत, माझाच मार्ग खरा, इतरांचे खोटे, म्हणू नका. कारण ते म्हणणे सत्य नव्हे. सत्याचा आग्रह धरताना आत्मचिंतन करा. अंतरात्म्याला साक्षी ठेवून सत्यासत्य विवेक करा. धार्मिक दुराग्रह व खऱ्या धर्मतत्त्वाचे अज्ञान हे आजच्या धार्मिक आतंकवादाचे मूळ आहे.

सर्व धर्मांची मूलतत्त्वे सारखीच आहेत. देश, काळ, समाज आणि परिस्थितीसापेक्ष धर्मतत्त्वाच्या प्रतिपादनात व आचरणात फरक झालेला आहे. दया, क्षमा, शांती, बंधुभाव, सत्य, अस्तेय ही मूलभूत तत्त्वे आपणास सर्व धर्मांत दिसतात. कोण कसा, कशाची व कशाप्रकारे प्रार्थना करतो या वरवरच्या भिन्नतेवरून मतभेद होण्याचे खरे तर काहीच कारण नाही. तरीपण माणसे लढतात. त्यांना लढविले जाते. **'जेहाद'**, धर्मयुद्धे होतात. सीमा-प्रांत यापेक्षा धर्मासाठी झालेल्या **'क्रुसेड'** - **'जेहादाची'** संख्या फार मोठी आहे. माणसाच्या धर्मविषयक अज्ञानाचा वा भलत्याच ज्ञानाचा हा अतिरेकी परिपाक आहे. नव्या वर्षाच्या नव्या घडीला आपण याचा शांतपणे विचार करून शांतीच्या, सद्भावनेच्या, सलोख्याच्या, बंधुभावाच्या मार्गावर निर्धाराने वाटचाल करण्याचा संकल्प करूया.

**आ नो भद्रा कृण्वन्तु विश्वतः** ! Let us all good qualities come to me from all world. ही भारतीय ऋषी-मुनींची उदात्त-व्यापक प्रार्थना आपण आपल्या व्यवहारात आणूया. त्यामुळे आपला व्यवहार गुणग्राहक - गुणसंग्राहक होईल. **'जे जे उत्तम, उदात्त उन्नत महान मधुर ते ते'** आपण पूजनीय नव्हे तर अनुकरणीय म्हणून स्वीकारूया. To be a butterfly फुलपाखरू व्हा, असे एका महान कवीने म्हटले आहे. आपण फुलपाखरासारखे विविध फुलांतून त्यांचा रंग व जातीची नसती चिकित्सा न करता मधुसंचय करावा. गुणांबरोबरच दोष सर्वत्र असतात. आपण गुणांचे अनुकरण करावे. दोषांच्या नसत्या चर्चेत-वादात आपले बहुमूल्य जीवन व्यतीत करू नये. **विधायक दृष्टिकोन, व्यापक धोरण आणि माणुसकीचा धर्म** हीच आपल्या नव्या वर्षातील आचार, उच्चार व व्यवहाराची त्रिसूत्री ठरावी, हीच प्रार्थना !

**नववर्षाच्या अनंत शुभेच्छा !**
**नववर्ष शुभचिंतन !!**

**(विद्याधर ताठे)**
कार्यकारी संपादक,
**साईलीला**

# ।। सार्थ श्रीगणेश सूक्त व कवच ।।

▪ संकलन व अनुवाद - डॉ. सी. ग. देसाई



## ।। ॐ श्रीगणेशाय नमः ।।

गणपतीसूक्त हे ऋग्वेदातील लहानसे सूक्त आहे. या सूक्ताची देवता गणपती आहे. गणपती ही बुद्धीची आणि विद्येची देवता आहे. गणपती हा अग्रपूजेचा मानकरी आहे. सर्व कामांत निर्विघ्नता येण्याकरिता या देवतेची पूजा केली जाते. गणपतीसूक्तात गणपतीचे थोडक्यात वर्णन आहे. तरी, हे सूक्त यथाशक्ती म्हटल्यास गणपतीचे स्तवन होते. सर्व संतांनीसुद्धा ग्रंथारंभी गणेश स्तविला आहे. समर्थ रामदासस्वामींनी संपूर्ण एक समासच गणपतीकरिता दासबोधात लिहिला आहे. तसेच, ज्ञानेश्वरमहाराजांनीसुद्धा १२ ओव्या गणपती-स्तवनाला दिल्या आहेत. श्री साईसच्चरिताचा प्रारंभही ।। श्रीगणेशाय नमः ।। ने करण्यात आला आहे. गणपती म्हणजे गणांचा अधिपती. त्याला विघ्नांतकही म्हणतात.

### ।। श्रीगणपतिसूक्तम् ।।

।। श्रीगणपतीसूक्त ।।

(ऋग्वेद - मं - ८/सू - ८१/ऋ - १-९)

(ऋषी-कुसीदिन् काण्व, देवता-इंद्र, छंद-गायत्री)

ॐ आ तू नं इन्द्र क्षुमन्तं  
चित्रं ग्राभं सं गृभाय  
महाहस्ती दक्षिणेन ।।१ ।।

(हे महाबाहो, भक्तांना धन देणाऱ्या इंद्ररूपी (श्रीगणपती) देवा, आमच्या प्रीत्यर्थ तू आपले प्रशंसनीय, आश्चर्यकारक आणि संग्रहणीय धन दक्षिण/उजव्या हातात धारण कर !)

विद्मा हि त्वां तुविकूर्मिं  
तुविदेष्णं तुवीमघम्  
तुविमात्रमवोभिः ।।२ ।।

(हे कर्तृत्ववान आणि धनसंपन्न इंद्रा, भक्तरक्षक म्हणून

# ।। श्रीगणेशकवचम् ।।

(श्रीगणेशपुराणान्तर्गतम्)

श्रीगणेशाय नमः ।। गौर्युवाच ।। एषोऽतिचपलो दैत्यान्बाल्येऽपि नाशयत्यहो । अग्रे किं कर्म कर्तेति न जाने मुनिसत्तम ।।१ ।। दैत्या नानाविधा दुष्टाः साधुदेवद्रुहः खलाः । अतोऽस्य कंठे किंचित्त्वं रक्षार्थं बद्धुमर्हसि ।।२ ।। मुनिरुवाच । अथध्यानम् । ध्यायेत्सिंहगतं विनायकममुं दिग्बाहुमाद्ये युगे । त्रेतायां तु मयूरवाहनममुं षड्बाहुकं सिद्धिदम् । द्वापारे तु गजाननं युगभुजं रक्तांगरागं विभुं । तुर्ये तु द्विभुजं सितांगरुचिरं सर्वार्थदं सर्वदा ।।३ ।। अथ कवचम् । विनायकः शिखां पातु परमात्मा परात्परः । अतिसुंदरकायस्तु मस्तकं सुमहोत्कटः ।।४ ।। ललाटं काश्यपः पातु भ्रूयुगं तु महोदरः । नयने भालचन्द्रस्तु गजास्यस्त्वोष्ठपल्लवौ ।।५ ।। जिह्वां पातु गणक्रीडाश्चिबुकं गिरिजासुतः । वाचं विनायकः पातु दन्तान् रक्षतु विघ्नहा ।।६ ।। श्रवणौ पाशपाणिस्तु नासिकां चिंतितार्थदः । गणेशस्तु मुखं कंठं पातु देवो गणंजयः ।।७ ।। स्कंधौ पातु गजस्कंधः स्तनौ विघ्नविनाशनः । हृदयं गणनाथस्तु हेरंबो जठरं महान् ।।८ ।। धराधरः पातु पार्श्वौ पृष्ठं विघ्नहरः शुभः । लिंगं गुह्यं सदा पातु वक्रतुण्डो महाबलः ।।९ ।। गणक्रीडो जानु-जंघे ऊरू मङ्गलमूर्तिमान् । एकदंतो महाबुद्धिः पादौ गुल्फौ सदाऽवतु ।।१०।। क्षिप्रप्रसादनो बाहू पाणी आशाप्रपूरकः । अंगुलीश्च नखान्पातु पद्महस्तोऽरिनाशनः ।।११ ।। सर्वांगानि मयूरेशो विश्वव्यापी सदाऽवतु अनुक्तमपि यत्स्थानं धूम्रकेतुः सदाऽवतु ।।१२ ।। आमोदस्त्वग्रतः पातु प्रमोदः पृष्ठतोऽवतु । प्राच्यां रक्षतु बुद्धीश आग्नेय्यां सिद्धिदायकः ।।१३ ।। दक्षिणस्यामुमापुत्रो नैर्ऋत्यां तु गणेश्वरः । प्रतीच्यां विघ्नहर्ताऽव्याद्वायव्यां गजकर्णकः ।।१४ ।। कौबेर्यां निधिपः पायादीशान्यामीशनंदनः । दिवाऽव्यादेकदंतस्तु रात्रौ संध्यासु विघ्नहृत् ।।१५ ।। राक्षसासुर-वेतालग्रहभूतपिशाचतः । पाशांकुशधरः पातु रजः सत्त्वं तमःस्मृतिम् ।।१६ ।। ज्ञानं धर्मं च लक्ष्मीं च लज्जां कीर्तिं तथा कुलम् । वपुर्धनं च धान्यं च गृहान् दारान् सुतान् सखीन् ।।१७ ।। सर्वायुधधरः पौत्रान् मयूरेशोऽवतात्सदा । कपिलोऽजाविकं पातु गजाश्वान्विकटोऽवतु ।।१८ ।। भूर्जपत्रे लिखित्वेदं यः कंठे धारयेत्सुधीः । न भयं जायते तस्य यक्षरक्षःपिशाचतः ।।१९ ।। त्रिसंध्यं जपते यस्तु वज्रसारतनुर्भवेत् । यात्राकाले पठेद्यस्तु निर्विघ्नेन फलं लभेत् ।।२० ।। युद्धकाले पठेद्यस्तु विजयं प्राप्नुयाद्ध्रुवम् । मारणोच्चाटनाकर्ष-स्तंभमोहन-कर्मणि ।।२१ ।। सप्तवारं जपेदेतद्दिनानामेकविंशतिम् । तत्तत्फलमवाप्नोति साधको नात्र संशयः ।।२२ ।। एकविंशतिवारं च पठेत्तावद्दिनानि यः । कारागृहगतं सद्यो राज्ञा वध्यं च मोचयेत् ।।२३ ।। राजदर्शनवेलायां पठेदेतत्त्रिवारतः । स राजानं वशं नीत्वा प्रकृतीश्च सभां जयेत् ।।२४ ।। इदं गणेशकवचं कश्यपेन समीरितम् । मुद्गलाय च तेनाथ मांडव्याय महर्षये ।।२५ ।। मह्यं स प्राह कृपया कवचं सर्वसिद्धिदम् । न देयं भक्तिहीनाय देयं श्रद्धावते शुभम् ।।२६ ।। यस्यानेन कृता रक्षा न बाधाऽस्य भवेत्क्वचित् । राक्षसासुरवेतालदैत्यदानव-संभवा ।।२७ ।।

इति श्रीगणेशपुराणे । क्रीडाखण्डे पंचावष्टाशीतितमो (८५) तमोऽध्यायः । मूलपुराणे १४ तः ४२ श्लोकाः । श्रीगणेशकवचं संपूर्णम् ।

**श्रीगणेशकवचम् पाठभेद :** दैत्यान्बाल्येऽपि नाशयत्यहो/दैत्यानहन्तिबहुनपि; तुर्ये/तिष्ये/पुष्ये; विघ्नहा/दुर्मुखः; दारान्/दाराः; ध्रुवम/द्रुतम्.

या अत्यंत प्रभावी श्रीगणेशकवचाची १००० (एक हजार) आवर्तने केल्यावर हे सिद्ध होते. त्यानंतर दररोज हे एकदा तरी म्हणावे. आजाऱ्याला अथवा दृष्ट पडलेल्या मुलास या कवचाने मंत्रवून विभूती लावल्यास गुण येतो.

❑❑❑

तू सुप्रसिद्ध आहेस. तसेच, तू पुष्कळ कामे हाती घेणारा, महान दाता व खूप मोठ्या आकाराचा म्हणून प्रसिद्ध आहेस.)

**नहि त्वा शूर देवा**
**न मर्तासो दित्सन्तम्**
**भीमं न गां वारयन्ते ॥३॥**

(हे भक्तांनो, या धनाचा अधिपती, स्वयंप्रकाशी आणि भक्तांचा तापसंताप निवारण करणाऱ्या इंद्राचे आपण स्तवन करू या.)

**एतो न्विन्द्रं स्तवामे-**
**शानं वस्वः स्वराजम्**
**न राधसा मर्धिषन्नः ॥४॥**

(एखाद्या मोठ्या, भव्य नंदीप्रमाणे भीषण, सामर्थ्यसंपन्न, अनिवार्य आणि धनदात्या इंद्रा, कोणीही देव अथवा मनुष्य तुझा प्रतिबंध करू शकत नाही.)

**प्र स्तोषदुप गासिष-**
**च्छ्रवत् साम गीयमानम्**
**अभि राधसा जुगुरत् ॥५॥**

(हे सामगायन करणाऱ्या स्तुतिपाठकांनो, इंद्र तुम्हाला संपत्ती आणि आशीर्वाद प्रदान करो.)

**आ नो भर दक्षिणेना-**
**ऽभि सव्येन प्र मृश**
**इन्द्र मा नो वसोर्निर्भाक् ॥६॥**

(हे इंद्रा, आपल्या डाव्या व उजव्या हातांनी संपत्ती देऊन तू आम्हाला ऐश्वर्यसंपन्न कर !)

**उप क्रमस्वा भर**
**धृषता धृष्णो जनानाम्**
**अदाशूष्टरस्य वेदः ॥७॥**

(कंजूष लोकांचे धन लुटणाऱ्या हे आक्रमक इंद्रा, तू आम्हाला धन दे !)

**इन्द्र य उ नु ते अस्ति**
**वाजो विप्रेभिः सनित्वः**
**अस्माभिः सु तं सनुहि ॥८॥**

(हे इंद्रा, तुझे देण्यास योग्य असे सगळे धन आम्हा सुज्ञ आणि याचक भक्तांना तू दे !)

**सद्योजुवस्ते वाजा**
**अस्मभ्यं विश्वश्चन्द्राः**
**वशैश्च मक्षू जरन्ते ॥९॥**

(भक्तांनी बुद्धिपूर्वक स्तविलेल्या हे इंद्रा, तुझे रमणीय धन द्रुतगतीने आमच्याकडे येवो.)

॥ इति श्रीगणपतिसूक्तं समाप्तम् ॥


**श्रीगणपतीसूक्तावरील टीप :**

''आ तू न इन्द्र क्षुमन्तं'' या ऋचेने प्रारंभ होणारे हे सूक्त ऋग्वेदातील संदर्भानुसार इंद्रसूक्त असले तरी, लोकांमध्ये ते श्रीगणपतीसूक्त म्हणूनच सुविख्यात आहे. यातील 'इन्द्र' हा शब्द 'श्रेष्ठ' अशा अर्थाने उपयोजिला आहे. ''त्वं रुद्रस्त्वमिन्द्रस्त्वं'' या वाक्यानुसारही इंद्र हे श्रीगणपतीचेच रूप आहे. ६व्या ऋचेतील इंद्राचा 'सव्य' म्हणजे डावा आणि 'दक्षिण' म्हणजे उजवा हस्त, म्हणजे गणेशाच्या डाव्या आणि उजव्या सोंडेचे प्रतीक वाटते. ऋद्धी, सिद्धी आणि बुद्धी यांचा गणेश हा अधिपती असल्याची कल्पनाही दुसऱ्या ऋचेत आढळते. गणेश हे ब्रह्मणस्पती देवतेचे विकसित रूप असल्याच्या कल्पनेस या सूक्तामुळे पुष्टी मिळते.

# ओम नमोजी आद्या ।

## संतसाहित्यातील 'गणेशवंदना'

- विद्याधर ताठे
कार्यकारी संपादक, साईलीला



कोणत्याही कार्याचा शुभारंभ श्री गणेशाच्या वंदनाने करण्याची आपली सांस्कृतिक परंपरा आहे. मग ती पूजा असो, ग्रंथलेखन असो, गायन असो. चक्क तमाशासुद्धा 'गण' म्हणूनच प्रारंभ होतो. संतांनी आपल्या लेखनारंभी केलेली 'गणेशवंदना', नववर्षाचा आरंभ करताना आपण पाहूया आणि नव्या वर्षाचा 'श्रीगणेशा' करूया. संत ज्ञानेश्वर, संत एकनाथ आणि साईसच्चरिताचे हेमाडपंत यांनी केलेल्या गणेशवंदनांचे शब्ददर्शन -

**गा**नसम्राज्ञी लता मंगेशकर यांनी गायिलेले **''ॐ नमोजी आद्या''** हे मंगलाचरण बहुतेक मराठी रसिकांना कानपरिचित आहे. हे मंगलाचरण संत ज्ञानदेवांनी ज्ञानेश्वरी ग्रंथाच्या प्रारंभी केलेली गणेशवंदना आहे. **''देवा तुचि गणेशु''** अशी देवाची गणेशाच्या रूपात ते वंदना करतात. ज्ञानदेवांचे हे मंगलाचरण ग्रंथ-आरंभाचा एक आदर्श - अनुकरणीय वस्तुपाठ ठरला व पुढील संतांनी तोच वारसा भक्तिभावाने - निष्ठेने ग्रंथलेखन करताना पुढे चालविला असे दिसते.

**ॐ नमोजी आद्या । वेद प्रतिपाद्या ।**
**जय जय स्वसंवेद्या । आत्मरूपा ॥१॥**
**देवा तुचि गणेशु । सकल मति प्रकाशु ।**
**म्हणे निवृत्तीदासु । अवधारिजो जी ॥२॥**

अशा आशयगर्भ - भावरम्य ओव्यांनी संत ज्ञानेश्वरांची गणेशवंदना सुरू होते. श्री गणेशाचे हे रूपक मराठी साहित्यातील एक अनोखे भावकाव्य आहे. ''ओम नमोजी आद्या ।'' या ओवीने प्रारंभ होणारी ही गणेशवंदना -

**अकार चरण युगुल । उकार उदर विशाल ।**
**मकार महामंडल । मस्तकाकारे ॥१९॥**
**हे तिन्ही एकवटले । तेथ शब्दब्रह्म कवळले ।**
**ते मियां गुरुकृपा नमिले । आदिबीज ॥२०॥**

या ओव्यांनी परिपूर्ण होते. गणेशवंदनेनंतर ज्ञानदेव विद्येची देवी सरस्वतीचे व आपले सद्‌गुरु श्री निवृत्तीनाथ यांचेही वंदन करतात.

वेद हीच गणेशाची उत्कृष्ट सजवलेली एक मूर्ती आहे. स्मृती हे तिचे अवयव आहेत. अठरा पुराणे हे या मूर्तीचे रत्नालंकार आहेत. सुरेख शब्दरचना हे गणेशमूर्तीवरील महावस्त्राप्रमाणे आहे. सहा शास्त्रे या गणेशाचे सहा हात आहेत. एकमेकांशी विसंवादी वाटणारी सहा दर्शने - मते या गणेशाच्या हातातील आयुधे आहेत. त्याच्या एका हातात अनुमानरूपी परशु आहे. तसाच, एका हातात ब्रह्मरसाने भरलेला ब्रह्मज्ञानरूपी मोदक आहे. पूर्वमीमांसा व उत्तरमीमांसा ही शास्त्रे गणेशाचे दोन कान आहेत. द्वैत - अद्वैत ही मते गणेशाची गंडस्थळे आहेत. दशोपनिषदे सुगंधी फुलांप्रमाणे गंडस्थळावरील मुगुटावर शोभत आहेत.

ॐमधील अकार गणेशाचे दोन चरण आहेत. उकार गणेशाचे विशाल उदर आहे. मकाराची तिसरी मात्रा गणेशाचे मस्तक आहे. असा हा ओंकाररूपी अक्षर गणेश बीजरूप, स्वसंवेद्य आहे, असे संत ज्ञानदेव वर्णन करतात व अशा गणेशवंदनेच्या मंगलाचरणाने आपल्या अलौकिक अशा ज्ञानेश्वरी-भावार्थ दीपिका या दिव्य प्रबंध लेखनाचा 'श्रीगणेशा' करतात. यामुळेच कोणत्याही गोष्टीच्या सुरुवातीला - प्रारंभाला आपण 'श्रीगणेशा' असेच म्हणतो. गणेशवंदनेने आरंभ ही मराठी भाषेला संत ज्ञानदेवांची देणगी आहे.

### संत एकनाथांची गणेशवंदना

संत एकनाथांच्या नावावर विपुल ग्रंथसंपदा आहे. 'नाथ भागवत', 'अभंग गाथा', 'रुक्मिणी स्वयंवर', 'चतुःश्लोकी भागवत', 'स्फुट काव्य-प्रकरणे' आणि 'भावार्थ रामायण' हे त्यांचे प्रमुख साहित्य.

'भावार्थ रामायण' हा नाथांचा सर्वांत मोठा ग्रंथ. सुमारे २५००० ओव्यांचा. या ग्रंथातील ६ कांडांपैकी बालकांड,



अयोध्याकांड, अरण्यकांड, किष्किंधाकांड आणि सुंदरकांड ही कांडे नाथांनी लिहिलेली आहेत. हे लेखन चालू असतानाच नाथांचे देहावसान झाले. पुढील उत्तरकांडाचे लेखन नाथशिष्य गावबा याने केले, अशी भाविकांची समजूत आहे.

ज्ञानेश्वरीची सुरुवात "**ओम नमोजी आद्या। वेद प्रतिपाद्या।**" अशी आहे. या ओवीशी अत्यंत साम्य सांगणाऱ्या ओवीने संत एकनाथ आपल्या भावार्थ रामायणाचा 'श्रीगणेशा' करतात. ती ओवी अशी -

**ॐ नमो अनादि आद्या । वेद वेदान्त वेद्या ।**
**वंद्याहि परम वंद्या । स्वसंवेद्या श्रीगणेशा ॥१॥**

ज्ञानेश्वर गणेशवंदनेच्या २० ओव्या लिहितात व मग सरस्वतीचे वंदन करतात. भावार्थ रामायणात नाथमहाराज पहिल्या ६ ओव्यांत गणेशवंदना करतात व ७व्या ओवीनें सरस्वतीवंदन सुरू करतात. नाथांच्या गणेशवंदनेतील पुढील ओव्यांतून आपणास सतत ज्ञानेश्वरांनी केलेल्या मंगलाचरणाचीच आठवण होते. हेच ज्ञानदेव - एकनाथ यांच्यातील परस्पर भक्तीबंध होत. नाथमहाराज गणेशवंदन करताना लिहितात -

**तुझे निर्धारिता रूप ।**
**केवल अरूपाचे स्वरूप ।**
**तेथे अवेव कल्पिता अमूप ।**
**तव कल्पनेचा लोप स्वरूपी तुझ्या ॥२॥**



यालागी जैसा आहासि तैसियासि।
नमन निराकारे साकारासि।
तव अंगत्व मुकले अंगासि।
भज्य भजकासि अद्वैत ।।३।।

ज्ञानतेजे सतेज परशु।
नित्यस्मरणाचा अंकुशु।
आनंद मोदकाचा सुरसु।
मुखी सुसी घासु निजभक्ता ।।४।।

ऐसे आइकोनि स्तवन।
संतोषला गजानन।
माझा वदनी वसुनिवदन।
वक्ता वचन स्वये जाला ।।५।।

ऐसा जाहला सुप्रसन्न।
तेणे विघ्नचि केले निर्विघ्न।
उन्मेखेसि बोलिला आपण।
भावार्थ रामायण चालवी वेगी ।।६।।

## हेमाडपंतांची गणेशवंदना

हेमाडपंतकृत 'श्री साईसच्चरित' पोथी साईभक्तांचे गीता - भागवत आहे. हा ग्रंथ साईबाबांच्या अनुमतीने साईबाबा असतानाच हेमाडपंत यांनी लिहिला व बाबांना लिहिला तसा तसा वेळोवेळी वाचूनही दाखविलेला आहे. इ. स. १९२३ साली, म्हणजे बाबांच्या महासमाधीनंतर ५ वर्षांनी मुंबईतून संस्थानच्या 'साईलीला' मासिकाचे प्रकाशन सुरू झाले आणि हेमाडपंतांचा 'श्री साईसच्चरित' ग्रंथ अध्यायवार 'साईलीला'मधून क्रमशः प्रकाशित झाला. १९२३ च्या चैत्र महिन्याच्या पहिल्या अंकात हेमाडपंत विरचित श्री साईसच्चरित ग्रंथातील 'गणेशवंदना' प्रसिद्ध झालेली आहे.

प्रथम वंदू गणपती।
वक्रतुंड हेरंब मूर्ती।
चतुर्दश विद्यांचा अधिपती।
मंगलाकृति गजमुख ।। ३ ।।
पोटीं चतुर्दश भुवनें मावतीं।
म्हणोनि गा तुज लंबोदर म्हणती।
परशु सतेज धरिसी हस्तीं।
विघ्नोच्छित्त्यर्थ भक्तांच्या ।। ४ ।।
हे विघ्नविघातोपशमना।
गणनाथा गजानना।
प्रसाद पूर्ण करीं मद्वचना।
साष्टांग वंदना करितों मी ।। ५ ।।

हेमाडपंतांच्या या श्री साईसच्चरिताच्या आरंभीच्या ओव्या आणि संत ज्ञानेश्वर - एकनाथांच्या गणेशवंदना यांमध्ये एकप्रकारे विलक्षण साम्य आहे.

भक्तांचा साह्यकारी, भवार्णवाची पोत, ज्ञानज्योत, मूषकवहना, गिरिजानंदना, मंगलवदना अशा अनेक विशेषणांनी हेमाडपंतांनी आपल्या गणेशवंदनेच्या ओव्यांमध्ये श्री गणेशाची स्तुती केलेली आहे आणि ग्रंथलेखनाची निर्विघ्न समाप्ती व्हावी, अशी प्रार्थना केलेली आहे.

पुढे हेमाडपंत श्री साईबाबांचीच गणेशरूपात वंदना करतात, ती अशी -



हा साईच गजानन गणपती ।
हा साईच घेऊनि परशु हातीं ।
करोनि विघ्नविच्छित्ती ।
निज व्युत्पत्ति करू कां ॥१०॥

हाचि भालचंद्र गजानन ।
हाचि एकदंत गजकर्ण ।
हाचि विकट भग्नरदन ।
हा विघ्नकानन-विच्छेदक ॥११॥

हे सर्वमंगलमांगल्या ।
लंबोदरा गणराया ।
अभेदरूपा साई सदया ।
निजसुखनिलया नेईं गा ॥१२॥

हेमाडपंतांप्रमाणेच सर्व साईभक्तांनाही साईबाबा हेच श्री गजानन वाटतात. श्री साईंच्या, म्हणजेच साईगणेशाच्या वंदनेने - स्तुतीने आपल्या नव्या वर्षाचा 'श्रीगणेशा' होवो, आपणास हे नववर्ष सुखसमृद्धीने भरभराटी जाण्यात घडो, हीच मंगलकामना !

❑❑❑

# नववर्षाची नवी निळाई

निळ्या नभी पक्षी निळा । नवे सूर गातो गातो ।
आनंदाच्या जगण्याला । गीत नवे देतो देतो ॥१॥

दुःख कधी दाटे उरी । त्यामागे सुखही येते ।
आसवांच्या सरीपाठी । हसूही क्षणात येते ॥२॥

ज्यांना म्हणावे आपले । तेच पाठ फिरविती ।
अशा वेळी परकेही । आप्त होती पाठिशी ॥३॥

डोळसांच्या डोळ्यांमध्ये । कोणी धूळ फेकितो ।
अशा वेळी आंधळ्याच्या । गाथी देवचि राखतो ॥४॥

वणव्याच्या होरपळे । वन मुक्याने जळते ।
नव्या मृगाच्या सरीने । रान हिरवे डोलते ॥५॥

निराशेच्या मागे आशा । अपयशापाठी यश ।
कर्म-संचिताचा खेळ । कधी पुण्याचे सुकृत ॥६॥

तेज सरे नभ काळे । ढग काळे खग काळे ।
दिशा येती अंधारूनि । कोंदटले मन माझे ॥७॥

साऱ्या मावळती आशा । निराशेची दाटे छाया ।
घाली साद त्या पक्षा । नवे सूर छेडण्या ॥८॥

येई वारा संगे धारा । येती थेंब थेंब टपोरे ।
काळे मेघ झरूनि सारे । नभ निळाई पांघरे ॥९॥

असा पक्षी अलौकिक । साद सदा सांभाळतो ।
जणु चैतन्याचे रूप । माझ्या अंगणात येतो ॥१०॥

आगमने तेजाच्या । मन मनास सावरते ।
विसरूनिया जोगियास । नवा ललाट रंगविते ॥११॥

आदि नाद सूर ताल । साईहरि पक्षीरूप घेतो ।
बासरीच्या सुरासंगे । निळा पक्षी पुन्हा गातो ॥१२॥

**नवे सूर गातो गातो ।**
**गीत नवे देतो देतो ॥**

**- ॲड. अरुण गोडबोले**
सातारा.

# साई वंदना



## अगाध साई

साईनाथ माझा। माझा साईनाथ ॥
दत्तगुरु तोचि। नाही दूजा साईनाथ ॥धृ॥
साई माझा गुरु। साई कल्पतरु।
साई माझा तारु। साई परमेश्वरू ॥
साई माझी माता। साई माझा पिता।
साई माझा बंधू। साई अनंत सिंधू॥
साई माझा धीर। निर्मल मनोहर।
साई माझा सागर। प्रेमाचा आगर॥
साई माझा मित। प्रशांत पल्लवीत।
साई दिगंबर। जयाचे शिरडी असे घर॥

- विनायक शिंदे
शाखा व्यवस्थापक,
सिंडिकेट बँक, शिरडी.

## साईच्या अंगणी

भक्तांसाठी शिरडीत साई लावून बसला धुनी।
चला रे साधून घ्या पर्वणी॥
साईच्या नाचून घ्या अंगणी॥धृ॥

तो दत्ताचा अवतार मनोहर।
कधी भासतो उमा-महेश्वर॥
तोच विदेही साई देही शिरडीत सिंहासनी।
चला रे साधून घ्या पर्वणी॥१॥

श्रद्धा-सबुरी मंत्र तयाचा।
ध्यास जया जनउद्धाराचा॥
उदी तयाची साक्षात् अमृत संजीवनी।
चला रे साधून घ्या पर्वणी॥२॥

बोध जयाचा दुर्लभ मौलिक।
एकच आहे सबका मालिक॥
बंधुभावना सदैव जागृत ठेवा मनी।
चला रे साधून घ्या पर्वणी॥३॥

सर्वांभूती तोच व्यापला।
मंदिर मस्जिद भिन्न न त्याला॥
स्वार्थासाठी तयाची करू नका वाटणी।
चला रे साधून घ्या पर्वणी॥४॥

अशी हाक तयास द्या हो।
ऐकू जाऊ द्या साईस टाहो॥
शिरडीतून तो येईल रे धाऊनी।
चला रे साधून घ्या पर्वणी॥५॥

- प्रिया प्रकाश पोतदार
६-ब, वृंदावन अपार्टमेंट, हरेश्वर नगर,
रिंग रोड, जळगाव.

## जय देव जय देव जय श्री साईनाथा !

जय देव जय देव जय श्री साईनाथा, जय श्री साईनाथा।
मशीदमाईची पायरी चढता टेकिला माथा ॥धृ॥

गुरु ईश्वर आपण सद्‌गुरु जगाचे।
साक्षात् भावमूर्ती सुंदर तेजाचे।
स्फुरू दे आमुच्या हृदयी तंव नामाची गाथा ॥१॥
मशीदमाईची पायरी...

सुंदर तेजातून उजळल्या भक्तीच्या ज्योती।
धूपारतीने कळू दे मनाच्या वृत्ती।
चरणांशी स्मरल्या अवघ्या दुःख-व्यथा ॥२॥
मशीदमाईची पायरी...

एक साईनाम ऋणी करी देवा।
नित्य राहू दे आपुल्या समाधीचा ठेवा।
लावावे भक्ति-मुक्तीच्या अविनाशी पंथा ॥३॥
मशीदमाईची पायरी...

जय देव जय देव जय श्री साईनाथा, जय श्री साईनाथा।
मशीदमाईची पायरी चढता टेकिला माथा ॥धृ॥

**- सनी**

## तुझी शिरडी पावली !

साई तुझ्या चरणी
मिळो मला सहारा।
हीच आस लावली
तुझी शिरडी पावली ॥१॥
तुझी प्राप्त करण्या
कृपा माझ्या कुटुंबा।
लाभली तुझी सावली
तुझी शिरडी पावली ॥२॥
भावपूर्ण पूजनात
चेतना प्रगटली।
सौख्य माया लाभली
तुझी शिरडी पावली ॥३॥

**- एम. के. गुम्मलवार**
विणकर कॉलनी, नांदेड.

## साईधाम

साई म्हणती सारे, रूप ते गोजिरे।
नयनीं बसवावे, रूप ते साजिरे ॥

आगळी ती मूर्ती, उंच कळस वरती।
त्याकडे पाहतां, म्हणे होई इच्छापूर्ती ॥

लांबच-लांब पंगतींचा मेळा, बसे किती वेळा।
काय तो वर्णावा, महाप्रसादाचा सोहळा ॥

दिगंबराची शांत मूर्ती, वसली असे समीप।
समोर उंच झाडांच्या छायेत, तेवत असे नंदादीप ॥

जवळ एक रम्य बाग, हिरवीगार जागोजाग।
सारे म्हणती तिला, साईंची लेंडीबाग ॥

पहावे ते दृश्य थांबूनि जरा, खळखळणारा अवखळ झरा।
टाके सर्वां मोहवूनि, वाटे जणू खरा ॥

तिन्ही सांजसवे, तेथे निवांत बसावे
प्रपंचाचे विचार, सारे विसरोनी जावे ॥

**- मंगेश शां. पाडाव**
मिरजोळे, रत्नागिरी.

## साई म्हणे....

मजवरी कुणाचे प्रेम खरे ?
जे बहिरे मूक तरी गहिरे
जे मुक्त बंधनातूनि सारे
जे न दिखाऊ करी नखरे
जे जाणून घेई मज नजरे
जे देण्या-घेण्या कधी न करे
जे पायरी कधी नच उतरे
जे स्फूर्ति विलासातून बहरे
जे करी न चौकशी परभारे
जे व्यक्त होत नच उपचारे
मज देई कुणी का असे बरे
मजवरी कुणाचे प्रेम खरे ?

**- प्रा. डॉ. माधवराव दीक्षित**
शिवाजीनगर, पुणे.

## विठ्ठल-साई

धन्य वंश कुळ, जपता विठ्ठल।
मायेचे आवळ, गळूनि जाती ॥१॥

जाती भय चिंता, पळती घोर व्यथा।
निर्विकार चित्ता, विषय नुरे ॥२॥

नुरे अहंकार, शांत हो मत्सर।
शांतीचे माहेर, घरा परते ॥३॥

परते सुवासाचा, गंध विश्वव्यापी।
सद्विचार कुपी, उघड होई ॥४॥

होई हृदयाचा, कापसाचा फाया।
'दास' धन्य काया, विठ्ठल नामे ॥५॥ साई नामे०

- रामदास ह. शिंदे
(साहित्य विशारद)
मुलुंड (पूर्व), मुंबई.

## साई !

तुझा मी नाही, तरी अशी का ओढ जीवा तुझी लागली...
साई हाक तुझी रे आली ! ॥धृ॥
का रे ओढूनि मला तू नेशी ?
मी सापडलो या भवपाशी
मायेचा रे पडला वेढा, तुझी कळेना बोली !
मार्ग माझा शब्द-फुलांचा
थेंब चाखतो अमृताचा
तुझ्या भक्तीची माझ्या कानीं, तार कुणी छेडिली ?
असा कसा मी झालो जागा
नकळत जुळला भक्ति-धागा
ठावठिकाणा शोधीत आलो, चाहुल ही कसली ?
वाट चालता पाऊल अडते
गोंधळते मन भीती दाटते
देह अमंगळ, मळलेले मन, तुझी मूर्त चांगली !

- डॉ. श्रीकांत नरूले
१२६२ बी, खरी कॉर्नर, कोल्हापूर.

## सख्या साईनाथा !

सख्या साईनाथा, रक्षी मज आता।
दारी तुझ्या येता, भव भय कैचे॥

असोनि संसारी, नित्य घेता नाम।
हृदयी तुझे प्रेम, नित्य आहे॥

संकटी तारशी, नित्य निवारिशी।
अनेक उपाधी, तूच माझा॥

असा हितकारी, गुरु तूच माझा।
करितसे काजा, जिवे-भावे॥

असो तुझी दया, सदासर्वदा।
अंतःकाळी झणी, धाव घेई॥

तुझा भक्त नाही, कधी वाया गेला।
तरी मी तो वाया, जाईन कैसा॥

दृढ श्रद्धा माझी, आहे तुझ्या ठायी।
नथुराम ध्यानी, नित्य ठेवी॥

- नथुराम दादाजी जोशी
१६ जगन्नाथ निवास, मु. पो. केळवा रोड,
ता. पालघर, जि. ठाणे.

## साई-स्मरण

वाटलं होतं आज
तुला क्षणभर तरी पहावं
वाटलं होतं आज
तुला क्षणभर न्याहाळावं
वाटलं होतं आज
तुझ्याशी मनमोकळं बोलावं
वाटलं होतं आज
तुझ्या चरणी मस्तक ठेवावं
वाटलं होतं आज
वेळात वेळ काढावा
पण या संसाराच्या चक्रात
काहीच नाही मला जमलं
फक्त तुला मी स्मरलं
तुला मी स्मरलं

- सौ. रसिका सं. सुर्वे
४७/४, समीर अपार्टमेंट, तावरे कॉलनी, पुणे.

# ।। साई उवाच ।।

अध्याय ३७ व ३८

संग्राहक : प्र. का. सोमण
(निवृत्त ले. कर्नल)

(मागील अंकावरून पुढे)

## अध्याय ३७वा

**पार्श्वभूमी :**

अण्णासाहेब दाभोलकर सांगतात की, आत्मज्ञानाचे मंदिर बांधायचे असेल, तर त्यासाठी भगवत्‌भक्तीचा पाया लागतो आणि मुक्तीचा कळस झळकावयाचा असेल, तर विरक्तीचे तप पाठिशी लागते. भक्ताला जसा नामस्मरणाचा छंद असतो तसे गुरुलाही भक्ताचे स्मरण कायम असते. याबाबत बाबा म्हणतात :-

**''तुम्ही जाणा तुमची करणी।**
**मज तो अहर्निश तुमची घोकणी''।**

**(ऐशी बाबांची प्रेमळ वाणी।**
**असेल स्मरणीं बहुतांच्या ।।९३।।)**

बाबांचं सारं जीवन त्यांच्या भक्तांसाठी होतं. दिवस-रात्र कायमचे ते त्यांच्या भक्तांच्या सहवासात असायचे. या ३७व्या अध्यायात बाबांचे रात्रीच्या वेळी मशिदीमधून चावडीवर जाण्याच्या मिरवणुकीचे संपूर्ण वर्णन आहे. ते स्वतः पूर्णपणे वाचण्यासारखे आहे. बाबा चावडीवर एकाआड एक रात्री मुक्कामास पोहोचले म्हणजे सर्व भक्त बाबांच्या पाया पडून विदाई घेत. तात्याबा पाटील निजसदनी जाण्यास निघत, तेव्हा बाबा त्यांना म्हणत :- **''सांभाळ मज''** आणि आणखी पुढे म्हणत :-



"जातोस जा परी रात्रीमाजी।
मधून मधून खबर घे माझी" ॥
(बरें हो म्हणून मग तात्याजी।
चावडी त्यजी जाई घरी ॥२१४॥)

(जो दुनियेचा रक्षणकर्ता, तो देहधारी देव माणसाप्रमाणे, माणसांना सुखविण्यासाठी, किती सर्वसामान्य स्तरावर येऊन भक्तांना सुखवितो ते पाहिले म्हणजे, मन विस्मय पावते, नाही का ?

अध्याय ३७वा समाप्त

## अध्याय ३८वा

**पार्श्वभूमी :**

**या** अध्यायात बाबा भक्तांसाठी हुंडीत अन्न कसे शिजवायचे त्याचे संपूर्ण वर्णन आहे व ते मन तल्लीन करून सोडणारे आहे. बाबा भक्तांसाठी वाण्यांकडून अन्नासाठी लागणारे सर्व सामान स्वतः कसे आणीत, पाट्यावर घालून ते कसे वाटीत, अन्न तयार झाल्यावर ते आग्रहाने भक्तांना कसे जेवायला वाढीत, हे सारे वाचले म्हणजे आणि देव भावाचा किती भुकेला असतो व भक्तांची सेवा करायला किती कष्ट घेतो, हे पाहिले म्हणजे मन सद्‌गदित होऊन जाते.

एकदा एकादशीच्या दिवशी एक जुने-जाणते भक्त दादा केळकरांना बाबांनी विचारले,

"कोऱ्हाळ्याहूनि सागोतीशी।
आणविशी कां मजलागीं"

(त्यासाठी जरूर तेवढे पैसे मोजून बाबांनी त्यांना दिले.) "जातीनें जा" (अशी आज्ञा केली व वर) "तूंच हें केलें पाहिजे" ॥५४॥ असे सांगितले. त्यानंतर काही वेळाने बाबा त्यांना पुन्हा म्हणाले :- "अरे ही खरेदी करावयास। कोणास तरी पाठवीनास"

"जाण्यायेण्याचा त्रास।
उगी न सायास करावे" ॥६२॥



(या साऱ्या बोलण्यावरून बाबांना भक्तांना होणाऱ्या कष्टांची किती जाणीव असे, हे उघड होते. मात्र, बाबा स्वतः भक्तांसाठी वाट्टेल ते कष्ट उचलण्यास सदैव तयार असत. तांदूळ धुण्यापासून ते लाकडे चुलीत सारून, जाळ करण्यासाठी, चूल फुंकण्यापर्यंत सगळ्या प्रकारचे काम बाबा स्वतः करायचे. भक्तांना बाबांनी त्यांना परवानगी दिल्याशिवाय, ही बाबांची कामे करण्याची कोणाची छाती नसे.)

(अण्णासाहेब बाबांच्या या अन्न शिजविण्याच्या कामाचे वर्णन करतात :-

हंडीतूनि येतां वर।
वाफा उसळत असतां भयंकर।
अस्तनी सारूनि बाबा निजकर।
घालूनि खालवर ढवळीत ॥८१॥
कोठें रक्तमांसाचा हात।
कोठें तपेलें प्रखर रखरखीत।
परी न भाजल्याची खूण यत्किंचित... ॥८३॥)

**पार्श्वभूमी :**

**ए**कदा बाबांचे एक प्रिय भक्त नानासाहेब चांदोरकर आपले साडू बिनीवाल्यांबरोबर बाबांच्या दर्शनासाठी



शिरडीस आले असता बाबा एकदम नानासाहेबांवर रागावले व त्यांना विचारले :-

"वर्षानुवर्षे माझी संगती।
असतां तुझी हे कां गती।
काय झालें तुझिया मती ॥१३३॥
कोपरगांवीं कधीं आलां।
वृत्तांत काय वाटेसी घडलां।
मार्गांत मध्यें कोठें उतरलां।
तांगा हाकिला कीं थेट ॥१३४॥
नवल कांहीं घडलें वाटे।
साद्यंत परिसावें ऐसें वाटे।
सांग पां झालें काय कोठें।
असो मोठें सान वा" ॥१३५॥

(असे विचारल्याबरोबर नानासाहेबांचे तोंड उतरले. दत्तात्रेय हे बिनीवाल्यांचे आराध्य दैवत होते. कोपरगांवहून शिरडीस येताना वाटेत दत्तमंदिर लागले. बिनीवाल्यांना दत्ताचे दर्शन घ्यायचे होते; पण नानासाहेबांनी टांगा तेथे थांबविला नाही व शिरडीहून परतताना दत्ताचे दर्शन घेऊ, असे ते बिनीवाल्यांना म्हणाले. हे सारे सर्वज्ञ बाबांना लगेच कळले व त्यांना ते मुळीच आवडले नाही. ज्याची जेथे श्रद्धा आहे त्याचा आदर झालाच पाहिजे, ही बाबांची आग्रहपूर्वक शिकवण होती. म्हणून नानासाहेब मशिदीत येताच या गोष्टीबद्दल बाबा त्यांच्यावर फार रागावले, त्यांनी त्यांची कानउघाडणी केली आणि इशारा दिला :-)

"बरी ही नव्हे ऐसी त्वरा।
सुटलासि कांट्यावरी तूं बरा।
करूनि अनादरा दर्शनीं ॥१४५॥
दत्तासारिखें पूज्य दैवत।
असतां सहज मार्गीं तिष्ठत।
अभागी जो दर्शनवर्जित।
मी काय पावत तयासी" ॥१४६॥

पार्श्वभूमी :

**ए**कदा अण्णासाहेब दाभोलकरांचे जेवण झाले असता मोठा ग्लास भरून उत्तम ताक बाबांनी स्वतःच्या हातांनी त्यांना दिले. खरे म्हणजे अण्णासाहेबांचे पोट भरले होते व पोटात जागाच नव्हती. म्हणून ते ताक घ्यायला संकोच करीत होते. तेव्हा बाबा त्यांना म्हणाले :-

"पिऊन घे रे तें समस्त"
(योग न हा परत जणुं गमला ॥१८१॥ कारण यानंतर दोनच महिन्यांनी बाबांनी आपला देह ठेविला - अवतार संपविला.)

**अध्याय ३८वा समाप्त**




भावभक्तीची शिरापुरी।
कितीही खा सदा अपुरी।
जरी आकंठ सेविली तरी।
तृप्ति न परिपूर्ण कधींही ॥३६॥

श्री साईसच्चरित, अ. १४

(भक्ताच्या मनातील भक्तिभाव हा शिरा व पुरीच्या पक्वान्नाप्रमाणे असावा. असे हे पक्वान्न कितीही प्रमाणात सेवन केले, अगदी पोटभर तृप्ततेचे ढेकर देऊनसुद्धा परत खाल्ले तरीही ते अपुरेच राहते. त्याची पूर्णपणे तृप्ती कधीही होत नसते किंवा अशी ही शिरापुरी अधिक प्रमाणात सेवन

## साईचरित्र महासागर। अनंत अपार रत्नाकर॥

श्री साईसच्चरिताचे काळजीपूर्वक वाचन केले, तर त्यात भागवत, ज्ञानेश्वरी, दासबोध हे पवित्र ग्रंथ सामावलेले आहेत, हे दिसून येते. साईबाबांनी जणू ग्रंथांचे संमेलनच भरविलेले आहे, असे वाटते. आपल्या आवडत्या भक्तांना वेळोवेळी योग्य ते ग्रंथ वाचावयास देऊन त्यांचा उद्धार केलेला आढळतो. कै. रावबहादूर साठ्यांना गुरुचरित्राचा अजून एक पाठ-सप्ताह करावयास सांगून पूर्ण कृपादृष्टी केली, तर काकासाहेब दीक्षितांना एकनाथी भागवत नियमित वाचायची सवय लावली. लाडक्या शाम्याला, म्हणजेच माधवराव देशपांडे यांच्या गळी विष्णुसहस्रनाम पोथी कशी उतरवली, याचा सुंदर कथाभाग अध्याय २७ मध्ये आलेला आहे. मामलेदार देवांना ज्ञानेश्वरी कशी वाचावी, त्याचे निरूपण कसे करावे, याचा पाठ दिला, तर वझे या भक्ताकडून 'रामविजय' या ग्रंथाचे वाचन करून घेतले. नानासाहेब चांदोरकरांना भगवद्गीतेतील एका श्लोकाचे निरूपण करून कशाप्रकारे ज्ञानी केले व अर्थपूर्ण वैचारिक वाचन कसे असावे, हा धडा दिला. (अध्याय ३९) तसेच, माधवराव देशपांडे यांच्याकडे अनेक ग्रंथ जपण्यास व जोपासण्यास, ते वेळोवेळी उपयोगी पडतील, या हेतूने दिले.

'श्री साईसच्चरित' पोथीचे लेखक कै. दाभोलकर हे तर श्री साईसच्चरिताला महासागर म्हणतात...

**साईचरित्र महासारार। अनंत अपार रत्नाकर।**
**मी टिटवी तो रिता करणार। घडणार हें कैसेनी ॥३४॥**

- श्री साईसच्चरित, अ. २

असा हा थोर ग्रंथ म्हणजे, आजच्या कलियुगातील एक परिपूर्ण प्रासादिक ग्रंथ आहे. आपल्या अमोल नरजन्माचे सोने कसे करावे, याचे योग्य मार्गदर्शन हा ग्रंथ करतो. सर्वतऱ्हेच्या श्रद्धावान भक्त-भाविकांचा उद्धार करण्याचे सामर्थ्य त्यात आहे. अशा या ग्रंथाची प्रत्येकाने रोज एकतरी ओवी वाचावी, समजून घ्यावी व अनुभूती घ्यावी.

केल्याने अपचन होत नाही, अस्वस्थता येत नाही; उलट तृप्तीचे समाधान मिळते, आनंद ओसंडून वाहू लागतो.)

आता, वरील ओवीचे स्पष्टीकरण समजावून घेऊन ती अनुभवण्याचा प्रयत्न करू या.

चरण पहिले - **भावभक्तीची शिरापुरी।**

आपल्या मोयबोलीत ''भाव तोचि देव'' ही अर्थपूर्ण म्हण प्रचलित आहे. मनातील भाव, अंतःकरणातील तळमळ, विशुद्ध प्रेम यांची मापणी होऊच शकत नाही, त्यांचे मोल होऊ शकत नाही, इतका किंमती हा भाव असतो. अशा या शुद्ध भावप्रेमाच्या लहरी या अंतःकरणातून आपोआप उचंबळून याव्या लागतात. त्या अशा येऊ लागल्या की, त्या लाटांवर साक्षात् परमेश्वर आपणहून विराजमान होतो. त्या जीवावर त्याची कृपा होऊन जिवा-शिवाची भेट परमेश्वर घडवून आणतो व परमात्म्याच्या अस्तित्वाची जाणीव भक्ताला करवून देतो.

वरील चरणात भावाचा शिरा व भक्तीची पुरी अशी सार्थ उपमा देऊन भावभक्तीची गोडी अधिक वाढविली आहे. शिरा हे पक्वान्न जगन्नियंता श्री विष्णुनारायण यांना आवडणारा पदार्थ आहे. सत्यनारायणाला शिऱ्याचा नैवेद्य दाखविण्याची प्रथा आहे. तूप, रवा, दूध, साखर व केळी अशा पंचखाद्यांपासून शिरा हा प्रसाद बनवला जातो. असा प्रसाद, नैवेद्य सत्यनारायणाला अर्पण करून इतरांना वाटला जातो; त्यामुळे त्याला पवित्र कृपाप्रसादाचे महत्त्व प्राप्त होते; व तो प्रसाद जो ग्रहण करतो तो कृपावंत होतो.



रवा हा पदार्थ गव्हापासून बनवला जातो. गव्हाच्या एकेका कणात सात्त्विकता असते, तूप व दूध पवित्र अशा गोमातेपासून मिळते, केळे हे पूर्णान्न मानले आहे, तर साखर शुभ मानलेली आहे. अशा या अर्थपूर्ण पदार्थांपासून बनविलेला शिरा, त्याला भाजणे, शिजणे, साखरेत एकरूप होणे या पाकक्रियांतून अग्निदिव्य करावे लागते, तेव्हा त्याची मधुरता अधिक प्रगट होते. अशा पवित्र प्रसादशिऱ्याला भावाची उपमा देऊन गौरविले आहे. तेव्हा, अशा या भावाची थोरवी अधिक काय सांगावी! तसेच, भक्तीची पुरी. पुरी हाही पदार्थ गव्हाच्या पिठापासून बनवतात. पीठ पाण्यात भिजवून मळणे, तिंबणे, गरम तुपातून तळून काढणे या पाकक्रिया पार केल्यावर तजेलदार गोल फुगीर पुरी बनते. अशी ही पुरीरूपी भक्ती सोपी वाटली तरी, ती अतिशय सावधतेने करावी लागते. भक्तीतही खाच-खळगे (लोभ, मोहाचे क्षण) जागोजागी असतात. त्यांना टाळून पाय टाकायचा असतो, म्हणजे ती वाट परमेश्वराजवळ सुलभतेने जात असते.

अशी भावभक्ती करणारे साईबाबांचे अनेक भक्त झाले. त्यांचा श्री साईसच्चरित पोथीत वेळोवेळी उल्लेख आलेला आहे. बायजाबाई कोते पाटील या शिकल्या-सवरल्या नव्हत्या. परंतु, साईबाबांप्रति त्यांचा, मनीचा भाव एवढा श्रेष्ठ होता की, साईबाबांचे देवत्व ओळखून त्यांना आईच्या मायेने त्या जेऊ घालीत असत. त्यासाठी रानी-वनीं हिंडून काट्याकुट्यांतून वाट काढीत, अगदी पाय रक्तबंबाळ होईपर्यंतसुद्धा, त्या बाबांना शोधून काढीत असत. स्वतःच्या हाताने बनवलेली भाजी-भाकर बाबांना पत्रावळीवर वाढीत असत. नंतर पाणी प्यावयास देत असत. बाबा पोटभर जेवल्यावरच स्वतः जेवत असत. केवढी ही प्रखर भक्ती पहा! परत ती निरिच्छ भक्ती. अशी भक्ती देवाला जास्त आवडते आणि मग येथे भक्त श्रेष्ठ होतो व सर्वश्रेष्ठ परमेश्वर अशा भक्ताच्या पाठीमागे दुधाची वाटी (कृपानुग्रह) घेऊन धावत सुटतो. बायजाबाई साईबाबांच्या 'बायजामाय' झाल्या आणि साईबाबा त्यांचे 'लेकरु'. अशी ही भावभक्तीची शिरापुरी खाल्ल्याची करामत असते. आपण आपल्या भक्तिभावाची क्षमता वाढवून परमेश्वराच्या 'दुधाच्या वाटीतील' प्रसाद ग्रहण करण्यात आपली पात्रता वाढवून अनुभव घ्यावयाचा असतो.




चरण दुसरे - **कितीही खा सदा अपुरी।**

कुठलाही अन्नपदार्थ खाण्याला काही सीमा असते. पचवण्याची जेवढी ताकद असते तेवढेच अन्न सेवन करावे, नाहीतर आवडले म्हणून जास्त खाल्ले, तर अपचन होऊन आजारी पडायला होते. म्हणजे, अन्न सेवन करताना जिभेवर ताबा ठेवावा लागतो. मात्र, भक्तिभावाची शिरापुरी पोटभर खाऊन अगदी ओठापर्यंत जेवलो तरी, अपचन तर होत नाहीच, उलट ती परत परत खावीशी वाटू लागते व त्यामुळे आपण आपल्या नकळत परमेश्वराजवळ जात असतो. परमेश्वराच्या सान्निध्यामुळे परम आनंद, सुख, शांती, समाधान व प्रेम या पंचमाचा ठेवा प्राप्त होतो व तो इतरांना लुटावा, असे वाटू लागते आणि जसजसा हा ठेवा वाटत जातो तसतसा तो वृद्धिंगत होतो, तो कधीच अपुरा पडत नाही. अशी या भक्तिभावाची गंमत असते. आपणही अनुभव घेण्यासाठी प्रयत्नशील राहू या.

अशी ही भक्तिभावाची शिरापुरी खात होत्या - साईबाबांची निःस्वार्थपणे सेवा करणाऱ्या - 'राधाकृष्णामाई'. त्या काळच्या निराधार, विधवा, ना घर - ना दार अशा तरुण वयात अगदी एकाकी जीवन जगणाऱ्या. परंतु, त्या शिरडीला आल्या असता त्यांनी साईबाबांचे श्रेष्ठत्व ओळखले. साईबाबांचे येण्या-जाण्याचे रस्ते झाडण्याचे काम त्या करू लागल्या. अगदी वाटेतील विष्ठाही उचलून तेथील साफसफाई त्या करीत असत. त्यावेळी त्यांच्या मनात कोणतीही घृणा अथवा अहंभाव नसे. मी ब्राह्मण, श्रेष्ठ कुळातील, इतक्या कमी प्रतीची सेवा कशी काय करू, असा विचारही त्यांच्या मनात डोकावला नाही. पुढे पुढे तर साईबाबा संस्थानच्या निर्मितीचे श्रेय या बाईंना द्यावे अशा मोठमोठ्या आवश्यक वस्तूंचा संग्रह त्यांनी साईबाबांसाठी केला. त्यांचा हा गाढा भक्तिभाव पाहून साईबाबा दररोज स्वतः जेवणापूर्वी दोन भाकऱ्या व भाजी राधाकृष्णामाईंना पाठवीत असत. कधी लक्ष्मीबाई शिंदे यांना गोड शेवयांचा शिरा करावयास सांगत. त्या मोठ्या प्रेमाने साईबाबांसाठी बनवून आणत. तेव्हा, साईबाबा शिऱ्याचा काही भाग राधाकृष्णामाईंना खाण्यासाठी अगोदर पाठवून देत व मग स्वतः खात असत. केवढी अगाध श्रेष्ठ भक्ती व केवढा गाढा भाव ! अशी ही भक्ती कितीही केली तरी, अपुरीच नाही का !

चरण तिसरे - **जरी आकंठ सेविली तरी।**

भक्तिभावाची शिरापुरी आकंठ खायची, म्हणजेच भक्तिभावाची परिसीमा गाठायची, एवढी भक्ती आपोआप झाली पाहिजे. श्री साईसच्चरितात अशी भक्ती करणारे थोर भक्त म्हणजे अब्दुलबाबा. साईबाबांसाठी तरुण वयात घर-दार सोडून फकिराच्या सेवेसाठी आले. साईबाबा देहधारी असेपर्यंत त्यांची सर्वतऱ्हेची सेवा केली. एवढेच नव्हे, तर बाबांच्या देहत्यागानंतरही समाधीचा परिसर झाडलोट, साफसफाई, दिवाबत्ती करून स्वच्छ ठेवणारे अब्दुलबाबा हे साईबाबांचे असामान्य भक्त होऊन गेले. अखंड, निरंतर



सेवा म्हणजे काय, हे अब्दुलबाबांकडून शिकावे. साईबाबांनीही त्यांची सेवा, त्यांचा निरिच्छ गाढा भक्तिभाव ओळखून त्यांच्या कुटुंबाचे भले केले.

अशाच तऱ्हेने स्वतःला साईचरणीं झोकून देणारे साईबाबांचे श्रेष्ठ भक्त बाळा नेवासकर पाटील. यांचा भक्तिभाव एवढा उच्च प्रतीचा होता की, साईबाबा आंघोळ करीत ते पाणी पिऊन हे तृप्त होत. आपल्या शेतातील सर्व तयार झालेले धान्य गाड्या भरभरून साईबाबांपुढे आणून ठेवीत. त्यातील जी पोती घरी नेण्यासाठी म्हणून साईबाबा देत ती त्यांचे कुटुंब व मुले घरी घेऊन जात. साईबाबांघरचे प्रसादाचे धान्य म्हणून वर्षभर घरी वापरत आणि बाकीचे धान्य साईबाबांना अर्पण करीत. शेवटपर्यंत त्यांनी साईबाबांचा सहवास सोडला नाही. साईबाबांसाठी कुटुंब, मुले, शेती-वाडी, घर साऱ्यांचा त्याग केला. केवढी अभेद्य भक्ती! साईबाबांनी त्यांचे, त्यांच्या कुटुंबाचे कल्याण केलेच व नेवासकर पाटलांच्या तेराव्याला केवळ साईउदीने अन्नदान कमी पडू दिले नाही. बाळा नेवासकर पाटलांनी आयुष्यभर भावभक्तीची शिरापुरी आकंठ सेविली ती अशी.






आपण वरील भक्तांप्रमाणे आकंठ भक्तिभावाने शिरापुरी खाऊ शकतो का ?

**चरण चौथे - तृप्ति न परिपूर्ण कधींही।**

आंतरिक तळमळीने भगवद्भक्ती सुरू झाली की, त्याची गोडी अशी लागते की, इतर साऱ्या पाशांचा विसर पडतो; फक्त परमेश्वराशीच आपले सख्याचे नाते जुळते. हळूहळू द्वैताचा विसर भक्ताला पडतो. तो परमेश्वरापासून विभक्त राहूच शकत नाही. त्याला परमेश्वराच्या रूपात स्वतःला मिसळून एकरूप होण्याचा ध्यास लागतो. त्याच्या मनाची ओढ एवढी तीव्र होते की, त्याबाबत त्याची तृप्ती कधीच होत नाही. अशी अवस्था निर्माण होणे, हे उच्चतम भक्तिभावाशिवाय शक्य नाही. त्यासाठी भक्ताचे पूर्वसुकृत, सद्गुरुकृपा, गाढ श्रद्धा असणे आवश्यक आहे. अशाप्रकारे भक्तिमार्गात बुडी मारून स्वतःला झोकून द्यायची मनाची तयारी त्या दयाघन गुरुमातेच्या कृपाशीर्वादानेच होत असते.

श्री साईसच्चरिताचे लेखक 'हेमाडपंत' ऊर्फ गो. र. दाभोलकर यांचे उदाहरण आपल्यासमोर आहे. सुरुवातीला गुरु हवाच कशाला, म्हणणारे अण्णासाहेब दाभोलकर साईकृपेने परिपूर्ण परमानंद अवस्थेला पोहोचले, त्यांच्या ध्यानीं-मनीं साईस्मरण, साईनाम यांशिवाय दुसरे काहीच नसे. याचा परिणाम म्हणजेच श्री साईसच्चरिताची निर्मिती त्यांच्याकडून झाली व शेवट गोडही साईस्मरणातच झाला. असे हे साईकृपावंत हेमाडपंत भावभक्तीची शिरापुरी आकंठ सेवन करू शकले, पचनी पाडू शकले व जीवनाची यशस्वी परिपूर्णता साधू शकले.

अशाप्रकारे सदर ओवीचे स्पष्टीकरण आपण लक्षात घेऊन हळूहळू ती अनुभवू शकतो.

॥ शुभं भवतु ॥

**- साईसेविका**

❑❑❑

शिरडी भाव यात्रा

# रंग न लागता शिरडीतील रंगपंचमीने आम्ही दंग झालो !



**मं**गळवार, दि. १३ मार्च, २००१ रोजी पुन्हा एकदा शिरडीला जाण्याचा योग आला. खरं तर, सोमवारी निघून बुधवारी किंवा गुरुवारी सकाळी घरी येण्याचा विचार करून जाण्याचे ठरवले होते. परंतु, सोमवारी संकष्टी असल्याने मंगळवारी निघावे लागले. त्याप्रमाणे मंगळवारी, दुपारी ११.०० वाजता निघून सुमारे सव्वाबारा वाजता दादरच्या एशियाड बसस्टँडवर पोचलो. तिथे गेल्यावर १.०० च्या आधी कोणतीही बस नसल्याचं समजलं. त्यामुळे काही काळ वाट बघत तिथेच बसलो व १.०० वाजता बस आल्यावर त्या बसने शिरडीकडे प्रयाण केले. रात्री पावणेनऊ वाजता बस शिरडी एस्. टी. स्टँडवर पोचली.

श्री साईबाबांच्या समाधी मंदिराच्या कळसाचं दर्शन घेत व शिरडीत जागोजागी बसवलेल्या टी.व्ही. स्क्रिनवरील श्री साईबाबांचं दर्शन घेत साईप्रसाद भोजनालयाच्या मागील आवारातील नवीन साईभक्त निवासकडे (जे समाधी मंदिरापासून चालत २० मिनिटे अंतरावर आहे.) जाणाऱ्या बसची वाट बघत उभे राहिलो. काही वेळानंतर आलेल्या बसमध्ये चढून साईभक्त निवासकडे प्रयाण केले. साईभक्त निवासमध्ये साडेनऊ वाजता खोली मिळाली. खोलीत सामान ठेवून खाली असलेल्या कँटीनमध्ये नाश्ता केला. त्यानंतर श्री साईबाबांची शेजारती ऐकून झोपी गेलो.

दुसऱ्या दिवशी, म्हणजे दि. १४ मार्च, २००१ रोजी सकाळी समाधी मंदिराकडे श्री साईनाथांच्या दर्शनासाठी निघालो. परंतु, बाहेर आल्यावर समाधी मंदिराकडे जाणारी बस नसल्याने चालतच समाधी मंदिराकडे निघालो. समाधी मंदिरातील श्री साईनाथांच्या दर्शनासाठी बांधलेला व मंदिराच्या आजुबाजूला नव्याने बांधलेला परिसर प्रथमच पाहत असल्याने तो परिसर न्याहाळतच आत गेलो. साईभक्तांना ऊन-पावसात त्रास होऊ नये, यासाठी बांधलेला परिसर पाहून आनंद झाला. भुयारी मार्गातून जाताना ती वेळ आरतीची असल्याने थोडीशी घाईगर्दी झाली. या अनुभवाने मन थोडं व्यथित झालं. परंतु, श्री साईबाबांचं दर्शन व आरती घेतल्याने ते प्रफुल्लित झालं. त्यानंतर दि. १४ मार्च, २००१ रोजी रंगपंचमी असल्याने संध्याकाळी ४.०० वाजता श्री साईनाथांची रथातून मिरवणूक काढण्याचा कार्यक्रम होणार असल्याचं घोषित करण्यात आलं आणि श्री साईनाथांनी या मंगल प्रसंगी शिरडीत आणल्याबद्दल आम्हाला अत्यानंद झाला.

मनात नेहमी विचार येत असे की, आपण शिरडीला गेलो तरी श्री साईनाथांचा कोणताही उत्सव (उदा. विजयादशमी, गुरुपौर्णिमा, रामनवमी) पाहण्याचं भाग्य आपल्याला कधीच लाभणार नाही. कारण, त्यावेळच्या अलोट गर्दीत आपल्याला ते शक्य होणार नाही. परंतु, अशाप्रकारे अनाहूतपणे श्री साईनाथांच्या एका उत्सवाचा आनंद लुटण्याचा योग श्री साईनाथांनीच घडवून आणला होता.

संध्याकाळी मिरवणुकीत सामील होण्याचा विचार करीतच दुपारी साईप्रसाद भोजनालयात जाऊन साईप्रसादाचा लाभ घेतला. त्यानंतर दुपारी ३.०० वाजता निघून ३.३० वाजता द्वारकामाईत आलो. त्यावेळी ज्या रथातून श्री साईनाथांची मिरवणूक काढण्यात येणार होती त्या रथाची सजावट करण्यात येत होती. त्या रथाचं दर्शन झाल्यामुळे कृतकृत्य झाल्यासारखं वाटलं. एका बाजूला उभं राहून त्या रथाची सजावट पाहण्याचा आनंद लुटला. मिरवणुकीबरोबर जाणाऱ्या लोकांचे रंगीत कपडे पाहून आपण रथाबरोबर गेल्यास आपल्यावर रंग तर उडवणार नाहीत ना, अशी मनात शंका आली. कारण, शिरडीला रंगपंचमीचा सण साजरा केला जातो, याबाबत काहीच कल्पना नव्हती. पण, श्री साईनाथांनीच बोलावून नेलेलं असताना तिथे शंका कशाला घ्यायची !

बरोबर ४.०० वाजता श्री साईनाथांच्या रथाची मिरवणूक वाजतगाजत द्वारकामाईतून निघाली. आम्ही, म्हणजे मी, आई आणि माझी बहीण अशा तिघी, स्त्रियाच असल्याने रथावर गुलाल उधळत असताना तो आमच्या

अंगावर उडू नये म्हणून रथापासून काही अंतर ठेवूनच चालत होतो. काही अंतर चालून गेल्यानंतर एक स्थानिक महिला भेटली. तिने सांगितले की, दरवर्षी या मिरवणुकीला खूप गर्दी असते. परंतु, या वर्षी नगरला दंगल झाल्याने लोक आले नाहीत. हे ऐकून आम्हाला आणखीनच आश्चर्य वाटलं. कारण, जर गर्दी झाली असती तर हा रंगपंचमी सोहळा जवळून पाहता आला नसता. मिरवणूक पुढे जात असताना वाटेत घराघरातून बायका श्री साईनाथांच्या तसबिरीला ओवाळत होत्या व मिरवणुकीबरोबर चालणाऱ्या लोकांना प्रसाद वाटत होत्या. आम्हालाही हळदी-कुंकू व प्रसादाचा लाभ झाला. काही ठिकाणी घराच्या सज्जावरून लोक रंगीत पाणी ओतत होते. आश्चर्य म्हणजे, त्यातील एकही रंगीत थेंब आमच्या

गुरुवारी सकाळी शिरडीतील सर्व मंदिरांतील देवदर्शन घेतलं. शिरडीतील लेंडीबाग व इत्तर परिसरातील नूतनीकरणाचा मनसोक्त आनंद लुटला आणि श्री साईनाथांची दुपारी १२.०० वाजता आरती घेतली. त्यानंतर साईप्रसाद भोजनालयाकडे जाण्याचा विचार होता. परंतु, आईचे डोके दुखू लागल्याने आणि माझ्या व आईच्या गुरुवारच्या उपवासामुळे आम्हा दोघींना एकच वेळ जेवायचं असल्याने आम्ही दुपारी साईप्रसाद भोजनालयात भोजन घेण्याचा विचार रहित केला व रात्री भोजन घेण्याचे ठरविले. अशाप्रकारे श्री साईनाथांनी आम्हाला पालखी सोहळा पाहण्यासाठी थांबवून घेतलं.

त्यानंतर आम्ही खोलीवर जाऊन काही फलाहार करून आराम केला. संध्याकाळी ६.०० वाजता समाधी मंदिरात



अंगावर पडला नाही. पुढे मिरवणूक समाधी मंदिरात पोचली व तिथे संध्याकाळची आरती करण्यात आली. अशाप्रकारे श्री साईनाथांनी रंगपंचमीच्या अलौकिक सोहळ्याचे दर्शन घडवले.

त्यानंतर बुधवारी रात्री परत निघण्याचा विचार होता; परंतु दुसऱ्या दिवशी गुरुवार असल्याने श्री साईनाथांचा पालखी सोहळा पाहण्यासाठी थांबण्याचा विचार केला. काही वर्षांपूर्वी श्री साईनाथांच्या पालखी सोहळ्याचा आनंद लुटला होता. त्यामुळे गुरुवारी थांबावे की नाही याबाबतचा विचार डळमळीतच होता. नंतर, गुरुवारी दुपारच्या साईप्रसाद-भोजनाचा लाभ घेऊन निघण्याचा विचार करीतच बुधवारी रात्री झोपी गेलो.

गेलो. नंतर प्रसाद व इतर खरेदी करून संध्याकाळी ७.०० वाजता साईप्रसादालयात जाऊन प्रसाद-भोजन घेतले. त्यानंतर लेंडीबागेत व आजुबाजूच्या परिसरात फेरफटका मारून ठीक ८.०० वाजता द्वारकामाईत जाऊन बसलो. त्यावेळी तिथे पालखी सजविण्याचे काम चालू होते. लोक पालखीचे दर्शन घेत होते. लवकर गेल्यामुळे आम्हाला पालखीच्या अगदी जवळ बसण्याची संधी मिळाली. ही श्री साईनाथांचीच अगाध लीला होती.

तिथे बसलेलो असताना पालखी सजविणाऱ्या एका भक्ताला पालखीत काही अक्षता मिळाल्या. त्या अक्षता माझ्या आईकडे देत तो म्हणाला, ''अशा अक्षता मिळायला भाग्य लागतं.'' त्यानंतर त्या साईभक्ताला

कोणीतरी शिऱ्याचा प्रसाद दिला. त्यातील काही भाग त्याने आम्हाला दिला. अशाप्रकारे तिथे शिऱ्याच्या प्रसादाचाही लाभ झाला. काही वेळाने दर्शन घेण्यासाठी आलेल्या एका साईभक्ताने गुलाबपुष्पांचा एक गुच्छ, जिथे श्री साईनाथांची तसबीर ठेवण्यात येते त्या जागी, अर्पण केला. त्यावेळी तिथे असलेल्या दुसऱ्या एका साईभक्ताने ती गुलाबाची फुलेदेखील आम्हाला दिली. त्यानंतर दर्शनार्थींपैकी कोणीतरी आणलेल्या पेढ्यांचा प्रसादही आम्हाला मिळाला. काही वेळाने वाजतगाजत पालखीची मिरवणूक चावडीपर्यंत काढण्यात आली व तेथे आरती झाली.

समाधी मंदिरात न जाता मंदिराच्या बाहेर उभे राहून शेजारती घेण्यास सुरुवात केली. समाधी मंदिरातील श्री साईनाथांच्या मूर्तीचे दर्शन मूर्तीच्या बाजूला असलेल्या खिडकीतून घेत होतो. त्यामुळे प्रथम पूर्ण मूर्तीचे दर्शन होत नव्हते. मात्र, काही काळानंतर श्री साईनाथांनी पूर्ण मूर्तीचे व्यवस्थित दर्शन देऊन आम्हाला कृतकृत्य केले. अशाप्रकारे श्री साईनाथांचा पालखी सोहळा पाहून व शेजारती घेऊन आम्ही बसने खोलीवर परतलो. शुक्रवारी उरलेली कामे करून व साईप्रसादाचा लाभ घेऊन रात्रीच्या एस्. टी.ने मुंबईला परतलो.



पालखी सोहळा पाहण्याचा, त्यात सहभागी होण्याचा आनंद काही न्याराच होता. आरती झाल्यावर पालखी समाधी मंदिराकडे निघाली. त्यावेळी फटाके वाजवण्यात आले. फटाके वाजल्यानंतर त्यातून फुलांच्या पाकळ्यांचा प्रसादरूपी वर्षाव रस्त्याच्या कडेला उभ्या असलेल्या साईभक्तांच्या डोक्यावर झाला. अर्थातच, त्या काही भाग्यवान साईभक्तांमध्ये आम्हीही होतो. त्यानंतर साईनाथांची तसबीर समाधी मंदिरात ठेवून पालखी पुन्हा द्वारकामाईत परत आणण्यापर्यंतचा पालखी सोहळा आम्ही डोळे भरून पाहिला. अशाप्रकारे पालखी सोहळ्याची सांगता झाल्यावर शेजारती घेण्यासाठी आम्ही समाधी मंदिराकडे वळलो.

श्री साईनाथांनी आम्हाला शिरडीला बोलावून घेऊन अनपेक्षितपणे एकाच वेळी रंगपंचमी उत्सव सोहळा व पालखी सोहळ्याचं मनोहारी दर्शन घडवून आपल्या

**''नित्य मी जिवंत, जाणा हेचि सत्य**
**नित्य घ्या प्रचीत अनुभवे ।।''**

या वचनाचा प्रत्यय आणून दिला. त्याबरोबरच पालखी सोहळ्याच्या वेळी अक्षता, शिरा, पेढे, गुलाबाची फुले देऊन व फुलांचा वर्षाव करून त्यांनी आम्हावर आपल्या कृपाप्रसादाचा वर्षाव केला व आम्हाला धन्य केले. खरंच, अशी आहे श्री साईनाथांची अगाध लीला !

**– साईली**
गोरेगाव (पूर्व), मुंबई.



# "कोणताही धर्माचार्य दहशतवादाचे समर्थन करू शकत नाही !" - पोप जॉन पॉल

विसाव्या शतकाला निरोप देताना आणि एकविसाव्या शतकाचे आणि तिसऱ्या सहस्रकाचे स्वागत करताना, सत्याची सेवा करताना **चर्चकडून गेल्या दोन हजार वर्षांच्या काळात कळत-नकळत घडलेल्या अपराधांची पोप दुसरे जॉन पॉल यांनी उभ्या जगाकडे क्षमा मागितली** आणि मानवतेच्या हाती एक नवी कोरी पाटी दिली. या पाटीवर सुंदर नक्षी रेखाटली जाईल, अशी त्यांची, सर्व सज्जनांची आणि जगातील सर्व धर्मांतील आचार्यांची अपेक्षा होती.

मात्र, ११ सप्टेंबर २००१ रोजी ही पाटीच फोडण्याचा दुर्दैवी प्रयत्न झाला.

या पार्श्वभूमीवर पोप दुसरे जॉन पॉल यांनी जागतिक शांतता दिनानिमित्त अखिल मानवतेला अतिशय व्यथित अंतःकरणाने आणि तरीही मोठ्या विश्वासाने आशादीप दाखविणारा संदेश दिला आहे. ११ सप्टेंबर २००१ नंतर निर्माण झालेल्या परिस्थितीची नोंद घेताना पोप सांगतात की, 'दुष्टपणा' हा मानवी इतिहासातील अखेरचा शब्द नसेल. यापूर्वी जगावर निराशेची गडद अभ्रे येऊन गेली आहेत. **कधी कधी सैतानाने देवदूतावर मात केलेली असली तरीही मानवी जीवनातील अनंत आशा, आकांक्षा फलद्रूप झाल्याशिवाय राहणार नाहीत; कारण पाषाण हृदयाचे परिवर्तन करण्याची आणि वाळवंटात मळे उमलविण्याची किमया ईश्वराने गतकाळात केलेली आहे.**

**दहशतवाद हा मानवतेविरुद्ध केलेला गुन्हा आहे. कोणताही धर्माचार्य दहशतवादाचे समर्थन करू शकत नाही. देवाच्या वा धर्माच्या नावाने हत्येची हाक देणे, हा प्रचंड विरोधाभास आहे. शांतीशिवाय प्रगती असंभव आहे व क्षमेशिवाय शांती शक्य नाही.**

**'अब्राहमची लेकरे' असलेल्या तिन्ही धर्मांनी, ख्रिस्ती, इस्लाम व यहुदी यांनी निःसंदिग्ध शब्दांत दहशतवादाचा निषेध करण्याची आवश्यकता आहे.**

**पोप जॉन पॉल यांचा समयोचित संदेश -**

पोलंडमधून आलेल्या पोप जॉन पॉल यांनी नाझी आणि साम्यवादी हुकूमशाहीचे चटके आपल्या तरुणपणात भोगलेले आहेत. नाझी भस्मासुराचा अस्त झाल्यानंतर, छिन्नविच्छिन्न झालेल्या संस्कृतीच्या मंदिराची पुनर्बांधणी करण्याची आवश्यकता होती. त्यावेळी केलेल्या चिंतनाचे स्मरण करून देताना पोप म्हणतात, **"भयानक हिंसाचारामुळे नष्ट झालेली नैतिक आणि सामाजिक परिस्थिती कशी पूर्वपदावर आणता येईल, याचा विचार मी त्यावेळी करीत होतो. तेव्हा, शांती आणि क्षमादान याच मार्गाने माणूस पुन्हा उभा राहू शकतो, असे उत्तर मला माझ्या धर्मशास्त्राच्या प्रकाशात मिळाले."**

## न्याय आणि क्षमादान

प्रचंड अन्याय झालेला असताना क्षमेची भाषा आपण कशी करू शकतो, असा प्रश्न सांप्रत परिस्थितीच्या संदर्भात सर्वांना पडला आहे. पोप सांगतात, "क्षमादान न्यायाच्या विरोधी नाही, तर कटू भावना आणि सूडबुद्धी या गोष्टी न्यायाच्या विरोधी आहेत. खरी शांती न्यायाच्या पायावरच उभी असते. सर्वांच्या हक्कांचे रक्षण झाले पाहिजे. जगातील प्रगतीचा हिस्सा सर्वांना मिळाला पाहिजे आणि जबाबदाऱ्यांचा सर्वांनी सारखाच स्वीकार केला पाहिजे. वास्तविक, शांती हे न्यायाचे फळ आहे; परंतु माणूस स्वभावाने दुर्बल आहे, त्याला अहंकार आहे. त्यामुळे न्यायाला क्षमादानाची जोड मिळाली, तर दुखऱ्या मनावर फुंकर घालणे सोपे होते. न्यायाकडे डोळेझाक

अर्थात, मानवी अनुभवातूनही क्षमेची गरज दिसून येते, हे पटवून देताना पोप म्हणतात की, आपल्या हातून अपराध घडल्यानंतर माणसाला काय वाटते ? इतरांनी आपल्याला समजून घ्यावे, आपल्याला क्षमा करावी, आपल्याला सुधारणेची संधी द्यावी, अशीच आपली अपेक्षा असते ना ? मग, आपणही इतरांना क्षमा का करू नये ! कोणत्याही माणसाला पापाच्या चिखलात लोळत राहावेसे वाटत नाही. प्रत्येकाला नव्याने सुरुवात करायची इच्छा असते. त्याची नजर भविष्याकडे लागलेली असते.

**क्षमादान ही वैयक्तिक, तितकीच सामाजिक गरज आहे. संपूर्ण समाजालाही क्षमेची नितांत आवश्यकता आहे,** असे सांगून पोप प्रतिपादन करतात, ''बिघडलेले संबंध दुरुस्त करण्यासाठी, एकमेकांना दोषी ठरविण्याच्या वांझ परिस्थितीतून मुक्त होण्यासाठी आणि इतरांना संधी न देता त्यांच्यावर एकतर्फी आरोप करण्याच्या मोहापासून सुटका होण्यासाठी, व्यक्ती, कुटुंब, समाज, देश या सर्वांना क्षमेची जरुरी आहे. क्षमा न केल्यामुळे प्रगतीचे मार्ग खुंटतात आणि मानवाच्या वेदनेला अंत राहात नाही. **शांतीशिवाय प्रगती नाही; परंतु क्षमेशिवाय शांती नाही.''**

**भारत आणि पाकिस्तान या दोन राष्ट्रांनी परस्पर क्षमेची आणि सौहार्दाची वाट चोखाळली, तर दोन्ही देशांतून सोन्याचा धूर निघू शकेल.** फाळणीचा राग आपण मनात बाळगला आणि बांगलादेशाची निर्मिती करून आपण त्या प्रकारचे उट्टे काढले. बांगलादेशनिर्मितीच्या अपमानाची भरपाई करण्यासाठी काश्मीरचे निमित्त करून पाकिस्तान-पुरस्कृत दहशतवाद्यांनी भारतात निरपराध्यांच्या रक्ताचे पाट वाहण्याचा सपाटा लावला आहे. सूडाचा प्रवास किती काळ चालू राहणार आहे ? त्याला अंत नाही का ?

क्षमेचा मार्ग सर्वांना सहज पटत नाही, याची पोपना जाणीव आहे. क्षमा करण्यासाठी एक पाऊल मागे घ्यावे लागते. **तसेच, क्षमा करणे किंवा मागणे काहींना दुर्बलपणाचे लक्षण वाटते.** या विचारांचा परामर्श घेताना पोप म्हणतात, ''क्षमादानामुळे तात्कालिक हानी होत असली तरी, दीर्घकालीन लाभ घडत असतो. हिंसाचाराचे उलटे आहे. हिंसेमुळे त्वरित लाभ होत आहे, असे वाटले तरी, ते दीर्घकाळ टिकणारे दुखणे ठरते. **क्षमादान हा वरवर पाहता दुबळेपणाही वाटेल; परंतु क्षमा करण्यासाठी आणि स्वीकारण्यासाठी प्रचंड आध्यात्मिक बळ आणि नैतिक धैर्य अंगी असावे लागते.''**

मनाचा विकास झालेली व्यक्तीच क्षमा करू शकते आणि क्षमा स्वीकारू शकते. जातिवंत स्त्री-पुरुषच क्षमादानाचे शिवधनुष्य उचलू शकतात. भेकड आणि दुर्बल यांच्या नशिबी सूडाचा अखंड प्रवास असतो.

### धर्माचार्यांची जबाबदारी

**धर्म ही एक प्रचंड सामाजिक आणि आध्यात्मिक शक्ती आहे. समाजमनावर धर्मांचा आणि धर्माचार्यांचा फार मोठा पगडा असतो. म्हणून, प्रत्येक धर्माच्या आचार्याने आपल्या अनुयायांना** दहशतवादापासून **परावृत्त करावे** आणि त्यांना जीवनाभिमुख करावे, अशी अपेक्षा पोप व्यक्त करतात. ते म्हणतात, **''शांतीचे राज्य स्थापन करण्यासाठी सर्व धर्मांच्या आचार्यांनी नेटाने प्रयत्न करण्याची गरज आहे.** दहशतवादाची सामाजिक आणि सांस्कृतिक मुळे खणून काढण्यासाठी धर्माचार्यांनी पुढाकार घ्यावा. त्यासाठी मानवी जीवनाची प्रतिष्ठा आणि वसुधैव कुटुंबकम् या विषयांचा त्यांना पाठपुरावा करावा लागेल. निरपराध्यांची ठरवून केलेली हत्या हे महान दुष्ट कृत्य आहे, यात मुळीच शंका नाही. म्हणून, न्यायावर आणि स्वातंत्र्यावर आधारित समाजनिर्मिती ,करण्यासाठी धर्माचार्यांनी प्रयत्नांची पराकाष्ठा केली पाहिजे.''

**'अब्राहमची लेकरे' असलेल्या तिन्ही सेमिटिक धर्मांनी, म्हणजे ख्रिस्ती, इस्लाम आणि यहुदी या तीन धर्मांनी निःसंदिग्ध शब्दांत दहशतवादाचा निषेध करणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन पोपनी केले आहे.**

जगात शांती प्रस्थापित व्हावी म्हणून स्वतः पोपनी रोमजवळील असिसी गावात जगातील सर्व धर्माचार्यांबरोबर २४ जानेवारी रोजी एकत्र प्रार्थना केली. ''माणसाच्या मनात देवाचे आगमन होण्यासाठी, शांतीच्या मार्गातील अडथळे दूर करण्यासाठी, न्याय, नीती आणि स्वातंत्र्य यांची स्थापना करण्यासाठी आपण आशेने प्रार्थना करावी'', असा संदेश पोप महोदयांनी मानवतेला दिला आहे.

शेवटी, जगातील सर्व लोकांना आणि राजकीय नेत्यांना पोप महोदयांनी मंत्र दिला आहे : **''न्यायाशिवाय शांती नाही आणि क्षमेशिवाय न्याय नाही.''**

**– फा. फ्रान्सिस दिब्रिटो**

(सौजन्य : म. टा.)

करणे किंवा अन्यायाला प्रतिकार न करणे म्हणजे क्षमादान नाही.''

**संघटित दहशतवादामुळे आज जगाच्या अस्तित्वाला धोका निर्माण झाला आहे. त्यावर शांती आणि क्षमादान यांपेक्षा निराळा उपाय असू शकत नाही,** असे ठाम मत पोपनी व्यक्त केले आहे.

दहशतवादाने जागतिक शांततेला सुरुंग लावला आहे. या दहशतवाद्यांना पैशाचे पाठबळ असून निष्पापांच्या हत्या ते करीत आहेत, असे सांगून पोप म्हणतात, ''निरपराध लोकांना ठार करण्यासाठी दहशतवादी आपल्याच सहकाऱ्यांचा शस्त्र म्हणून वापर करतात तेव्हा ते आत्मनाश व मृत्यूच्या विचारानेच प्रवृत्त झालेले असतात. द्वेषभावनेतून दहशतवाद जन्माला येतो आणि तो वारसा पुढच्या पिढीला दिला जातो. मानवी जीवनाचा नाश हाच दहशतवाद्यांचा एककलमी कार्यक्रम असतो. म्हणून, **दहशतवाद हा मानवतेविरुद्ध केलेला गुन्हा आहे.**''

दहशतवादाचा प्रतिकार करावा का आणि तो कसा करावा, या प्रश्नाचे उत्तर देताना पोप म्हणतात की, दहशतवाद हा मानवी जीवनावरील हल्ला आहे, त्यामुळे प्रत्येकाला आत्मसंरक्षणाचा हक्क आहे. मात्र, दहशतवादाशी मुकाबला करीत असताना, सर्वसामान्य नितिमत्ता आणि कायदेकानून यांचे पालन करणे आवश्यक आहे. एका व्यक्तीच्या दहशतवादी कृत्याबद्दल संपूर्ण देश, एखादा वांशिक गट किंवा एखादा धर्म यांना वेठीस धरता कामा नये. आत्मरक्षणाच्या तत्त्वाचा पोपनी पुरस्कार केला आहे. प्रत्येक माणसाला आपला जीव वाचविण्याचा, जीवावर उठणाऱ्यांचा प्रतिकार करण्याचा पूर्ण अधिकार आहे.

**दहशतवादाच्या मुळांचा शोध घेऊन, मुले कुठारः करण्याची गरज नजरेआड करता येत नाही.** अन्यायाखाली दडपले गेल्यामुळे व्यक्ती आणि समाज हिंसाचाराचा अवलंब करीत आहेत का, कोंदटलेल्या भावनांचा तो विनाशक उद्रेक आहे का, याचाही शोध घेतला गेला पाहिजे. अन्याय आणि दारिद्र्य यांमुळे दहशतवादाला खतपाणी घातले गेले असेल, तर दहशतवादविरोधी मोहीम अंतिमतः अन्याय व दारिद्र्य यांविरुद्ध दिलेला लढा असावा, याचे भान आंतरराष्ट्रीय स्तरावर ठेवले गेले पाहिजे; कारण जिथे प्रदीर्घ काळ अन्यायाचे वातावरण असते आणि न्याय्य हक्कांचे उल्लंघन होत असते तिथे दहशतवाद सहज फोफावत असतो.

अन्यायामुळे दहशतवाद वाढीस लागत असला तरी, कुठल्याही परिस्थितीत दहशतवादाचे समर्थन करता येत नाही. दहशतवाद हे दुखणे आहे. तो समस्येवरील उपाय मुळीच नाही. आपल्या गटाच्या, आपल्या बांधवांच्या किंवा गोरगरिबांच्या भल्यासाठी, त्यांच्या हक्कांच्या रक्षणासाठी आपण लढत आहोत, हा दहशतवादी संघटनांचा दावा फसवा आहे; कारण दहशतवादाची सर्वांत जास्त झळ समाजातील दुर्बल घटकांना लागत असते.

निष्पाप माणसांना ठार करणे, हा दहशतवाद्यांचा ठरलेला कार्यक्रम आहे. अशा खुन्यांना पाठिशी घालणे म्हणजे, त्यांच्या पापाचे वाटेकरी होणे होय. तरीही, धर्माच्या नावाने दहशतवादाचा पुरस्कार केला जातो, याची जाणीव पोपना आहे. ते सांगतात, ''**कोणताच धर्माचार्य दहशतवादाचे समर्थन करू शकत नाही किंवा दहशतवादाला प्रोत्साहन देऊ शकत नाही. देवाच्या आणि धर्माच्या नावाने हत्येची हाक देणे, हा प्रचंड विरोधाभास आहे.**''

पोप पुढे लिहितात की, **देवाच्या आणि धर्माच्या नावाने केलेले हत्याकांड सर्वथैव अयोग्य आहे; कारण दया करणे, हा देवाचा धर्म आहे. तो मानवावर परम करुणा करतो.** म्हणूनच, ख्रिस्ताच्या सेवकांनी दयेचे आणि क्षमेचे शिलेदार झाले पाहिजे. **ख्रिस्ती धर्माच्या नावाने मध्ययुगात धर्मयुद्धे झाली होती, याचे विस्मरण पोप दुसरे जॉन पॉल यांना झालेले नाही. ख्रिस्ती धर्माच्या इतिहासातील त्या काळ्याकुट्ट कालखंडाबद्दल पोपनी गतवर्षीच अवघ्या मानवतेसमोर हात जोडून क्षमायाचना केली होती.** त्या नम्र भूमिकेमुळे आज पोप धर्मयुद्धाच्या संदर्भात अधिकारवाणीने बोलू शकतात.

### क्षमादानाची गरज

मुळात, क्षमा म्हणजे काय, आपण क्षमा करावीच कशासाठी, या प्रश्नांची उत्तरे देताना पोप सांगतात की, जशास तसे, ही नैसर्गिक प्रवृत्ती आहे. या सहज प्रवृत्तीच्या पलीकडे जाऊन क्षमा करावी लागते. देवपुत्र ख्रिस्ताने क्रूसावर अनंत वेदनेत असताना आपल्या विरोधकांना क्षमा केली. **म्हणजे, क्षमा करण्यासाठी नैसर्गिक पातळीवरून दैवी पातळीवर जावे लागते.**

गोंदवलेकर महाराज : पुण्यतिथी व जन्मोत्सवानिमित्त

# पवित्र ते कुळ, पावन तो देश ।

- प्र. न. जोशी



**इ.** स. १८७६-७७ चा सुमार. देशात सर्वत्र दुष्काळ पडला होता. मेघवृष्टी मंदावली. त्यातून सातारा जिल्ह्यातील माणदेश. आधीच उजाड व वैराण प्रदेश. जिकडे-तिकडे कोरडे शुष्क माळरान. उगाच कुठे हिरवट झुडपे दिसली तर अपवादाने. बाभळीची झाडे पर्णहीन बनली होती. माणसांना पुरेसे खायला नव्हते, तर गुरांना, मेंढ्यांना कुठून असणार ? नदी-नाले कोरडे ठणठणीत. पिण्यास पाणी नसे, तर पिकांना, झाडांना कुठून पुरणार ? अशा कठीण प्रसंगी त्या वेळच्या सरकारने दुष्काळी कामे सुरू केली. खडी फोडावी, ताली धराव्यात, कच्चे रस्ते करावेत, अशी कामे भर उन्हात सुरू असत. पण या कामात सर्वांना थोडाच वाटा मिळे. कामाच्या मानाने जाडीभरडी भाकरही दुर्मिळ होती. तरी गोरगरीब मजूर राबत. पोटाची खळगी झालेली, उन्हाने अंगे काळवंडून रापलेली, त्यावर लाज राखण्यापुरता कपडा, अशी स्थिती मजुरांची.

याच प्रदेशातले औंध हे एक छोटे संस्थान. राजा मोठा उदार, रसिक व धार्मिक वृत्तीचा. आपल्या छोट्या राज्यातील रयतेची स्थिती पाहण्यासाठी राजा दौऱ्यावर होता. फिरत फिरत राजा गोंदवल्याजवळ आला. गोंदवले हे माणदेशातले लहानसे टुमदार गाव. आजुबाजूला थोडीशी हिरवळ. येथेही तीव्र दुष्काळाचे सावट होतेच. राजाने येथे एक नवल पाहिले. गावाच्या आसपास हजार-दीडहजार गोरगरीब शेतात राबत होते. शेतातील माती सारखी करीत होते. दीडशे बैलगाड्या कामासाठी जुंपल्या होत्या. वरून ऊन तळपत होते; पण मजुरांचे काम शिस्तीत होते. बारा वाजता कामाची सुट्टी झाली. मजूर झाडाच्या सावलीत जमा झाले. ओळीने रांगा झाल्या. एका तेजःपुंज गृहस्थाने त्या मेळाव्यात प्रवेश केला. त्याच्या हातात भाकरींचे टोपले होते. शेजारी त्याची गृहलक्ष्मी सरस्वती हातात आमटीचे भांडे घेऊन तत्पर होती. ''श्रीराम जय राम जय जय राम''चा एकसुरात घोष झाला. त्या सत्त्वशील व दानशील गृहस्थाने एकेकाच्या ओट्यात दोन-दोन भाकरी टाकल्या. सरस्वतीने त्यांच्या वाडग्यात आमटी ओतली. सर्वांना दुपारचे जेवण मिळाले. रामप्रभूच्या नामगजरात उन्हाने शिणलेले आत्मे अमृताप्रमाणे मधुर जेवण जेवून तृप्त झाले. हे भोजन एका पुण्यपुरुषाच्या प्रसादासारखे

**ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज यांचा पुण्यतिथी सोहळा नुकताच (८ जानेवारी) साजरा झाला असून फेब्रुवारीत (दि. २४) त्यांचा जन्मोत्सव संपन्न होत आहे. वारकरी व रामदासी संप्रदायांचा सुरेख संगम गोंदवलेकर महाराजांच्या जीवनात दिसतो. पंथाचा-संप्रदायाचा कट्टरपणा हा आध्यात्मिक भावयात्रेतील - परमार्थाच्या वाटचालीतील सर्वांत मोठी धोंड आहे, हे सर्व भक्तांनी सदैव ध्यानात ठेवावे व नम्रपणे भक्तिरंगात रंगावे.**